
# श्री साईलीला



मुंबई येथील डॉक्टरांना रामाच्या स्वरूपात बाबांचे दर्शन

मार्च ६० पैसे १९७५

# अनुक्रमणिका – मार्च १९७५


| | |
|---|---|
| १. संपादकीय | श्रीसमर्थरामदासांचे पुण्यस्मरण |
| २. भिवपुरीचे श्रीसाईनाथमंदिर | श्री. चंद्रकांत सामंत |
| ३. श्रीसाईकृपेचा अनुभव | सौ. पार्वतीबाई भिडे |
| ४. वाऱ्यावरचे विचार | श्री. द. शं. टिपणीस |
| ५. श्रीसाईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ६. ज्योतिष शास्त्राचा ओनामा | होरालंकार शं. वा. देवधर |
| ७. श्रीसाईबाबा व सोळा आकडा | श्री. पांडुरंग भुजबळ |
| ८. श्रीसाईभक्त प्रा. डॉ. सौ.चारुशिला गुप्ते | सदानंद चेंदवणकर |
| ९. महाशिवरात्र | सदानंद चेंदवणकर |
| १०. अभंग पत्राचा संपादक–संत तुकाराम सुभाषचंद्र | |
| ११. नवे शांति निवास–भक्त निवास | — |
| १२. शिरडी वृत्त | — |
| १३. कै. गोविंद भिकाजी कासार | श्रद्धांजली |
| १४. श्रीसाई पद | श्री. रघुनाथ सांडभोर |
| १५. बोल बोल रे साईनाथा, साईभजन कर रे | श्री. उद्धव भावसार |
| १६. दर्शन | सौ. सुशिलाबाई हजारे |
| १७. श्रीसाईशाचे अबोल प्रेम | श्री. शाम जुवळे |
| १८. देवा मजला आलास धावुनि | श्री. डी. वी. पोतनीस |
| १९. श्रद्धागीत | सौ. श्री. शहाणे |
| २०. श्रीसाईबाबांची दृष्ट | श्री. अ. स. सबनीस |
| २१. श्रीसाईप्रसाद | सौ. माधुरी कुलकर्णी |
| २२. आगमन प्रसंगी | श्री. भ. धों. कुंभकर्ण |
| २३. तुझीच सत्ता विश्वी चाले | श्रीराम बाळकृष्ण आठवले |
| २४. अमृतानुभव अनुभवा निरयात | चित्रकार स. कृ. काळे |
| २५. माझ्या साईची कृपा | सौ. रजनी रामराम टेकाळे |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री साई वाक्सुधा

श्रेय काय प्रेय काय । ज्ञान झालें जरी उभय ।
तैसाचि ग्रहण व्यवसाय । जरी स्वायत्त पुरुषासी ॥९॥
तरीही प्राप्त होतां उभय । निवड करणें अवघड विषय ।
करुनि मंदबुद्धीवरी जय । आलिंगी प्रेय तयासी ॥१०॥
सारुं प्रेय आदरुं श्रेय । पुरुषार्थ तो हाचि होय ।
असतां पयमिश्रित तोय । पयचि घेई हंस जैसा ॥११॥
श्रेय आणि प्रेय हीं दोन । जरी हीं पुरुषाचे स्वाधीन ।
असमर्थ कराया हें विवेचन । विवेकहीन मंदमति ॥१२॥
श्रेय तें आहे कशांत । आरंभी जाणिलें पाहिजें निश्चित ।
मग येतां प्रतिबंध मार्गांत । प्रतिकार साद्यंत करुं ये ॥१३॥

श्रीसाईसच्चरित्–अध्याय १७ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] मार्च १९७५ [ अंक १२

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# श्रीसमर्थ रामदासस्वामींचे पुण्यस्मरण



माघ वद्य ९ शके १६०३ या दिवशी श्रीसमर्थ रामदास स्वामी समाधिस्थ झाले. त्यांचेप्रिय शिष्य स्वतंत्र महाराष्ट्र देशाचे निर्माते श्री शिवाजीमहाराज त्यांच्या एक वर्ष अगोदर इहलोक सोडून गेले होते. या दोन विभूतींनी महाराष्ट्राची अस्मिता निर्माण केली. धर्म आणि पुरुषार्थ यांचा पवित्र संगम त्या काळात या दोन विभूतींच्या संयोगाने घडून आला आणि महाराष्ट्रीयांच्या मनावर या दोन विभूतींच्या कार्याचा व उपदेशाचा खोल ठसा उमटलेला आहे. श्री ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ व रामदास यांनी महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाची मूर्ति घडविली, आणि परधर्मीयांच्या आक्रमणाखाली दबून जाऊन असहाय व निराश बनलेल्या समाजात ईश्वर भक्तीची प्रेरणा देऊन त्याला संजीवन दिले व त्यातून शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा उद्योग स्फुरण पावून विकसित व प्रभावी झाला. भक्तिमार्ग व पुरुषार्थ यांचा हा अन्योन्याश्रय कार्यकारण संबंध न्यायमूर्ति रानडे यांच्या दिव्य दृष्टीला आकलन झाला व त्यांनी तो प्रथम लोकांसमोर प्रभावीपणाने ठेवला.

मानवातील देवपण किंवा सद्भाव जागृत करून मनुष्याचे आचरण शुद्ध व सन्मार्गाने जाणारे व्हावे यासाठी सगळ्या संतांनी, प्राचीन काळच्या ऋषिमुनींनी प्रणीत केलेल्या सद्धर्माचा उपदेश केला. ज्ञानेश्वरांनी गीताशास्त्र सुगम करून महाराष्ट्रीयांच्या हातात दिले. एकनाथ, तुकारामांनी तो भक्तिमार्ग रूढ केला. त्या भक्तिमार्गातून वारकरी पंथ निघाला आणि जीवन हे परमार्थाला—ईश्वराला अर्पण करावे ही प्रेरणा मनुष्याची श्रेष्ठ प्रेरणा म्हणून मान्य झाली. परंतु या वृत्तीमध्ये एक त्रुटि राहून गेली. तिचा उल्लेख भागवत पुराणात भक्त प्रल्हादाने केला आहे. आपला बाप हिरण्यकशिपु याचा श्रीविष्णु भगवानाने नरसिंहावतार धारण करून वध केल्यावर, त्या क्रुद्ध भगवंताला शांत करून प्रसन्न करण्यासाठी प्रल्हादाने त्याचे स्तवन केले. त्या स्तोत्रामध्ये प्रल्हाद म्हणतो– 'हे देवा, मोक्षाची इच्छा करणारे ऋषि – मुनि मौन धारण करून अरण्यात एकांत वासात जाऊन राहतात. त्यांना इतरांच्या भवितव्याची काळजी नसते. पण मी जगतातल्या या लहान क्षुद्र प्रपंचात गढून गेलेल्या सामान्य लोकांना सोडून एकटाच मोक्ष इच्छीत नाही.' (नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षुरेकः) प्रल्हाद हा राजपुत्र होता. त्याला आपल्या प्रजाबांधवांची काळजी वाटली व त्यांच्यातच राहून भगवद्भक्ति करण्याची आपली इच्छा त्याने प्रगट केली. संतमंडळीविरुद्ध ते आत्मकेंद्रित

असतात व समाजाकडे त्यांचे लक्ष नसते असा एक प्रवाद आहे. तो सर्वस्वी खरा नाही. पण तो वाद बाजूला ठेवून मुद्दा लक्षात घ्यावयाचा तर, संत-मंडळींचा भक्तिमार्ग हा असंघटित असतो, समाज त्यामुळे संघटित बनत नाही. वारकरी समाज एकत्र येतो व त्यांची एक संघटनाही झालेली असते; तथापि ऐहिक जीवन संघटित रीतीने शुद्ध, तेजस्वी व यशस्वी करण्याला त्या संघटनेचा उपयोग होत नाही. या मुद्याकडे लक्ष दिल्यास श्रीसमर्थांच्या कार्याचे महत्त्व व वेगळेपण ध्यानात येते. देवभक्तीचाच प्रचार करताना समर्थांनी लिहिले—

**पर्वे करावी अचाटें । चालवावी भक्तांची थाटे ।**
**नाना वैभव कचाटे । उपासना मार्ग ॥**

श्रीसमर्थांनी यवनांच्या भीतीने नद्याडोहाते फेकून दिलेल्या देवांच्या मूर्ती शोधून काढून त्या ठिकठिकाणी स्थापन केल्या. त्यांचे उत्सव लोकाकडून सुरू करविले. ठिकठिकाणी बलभीम मारुतीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून बलोपासना करावी असा उपदेश करीत धर्म जागृति व स्वाभिमान यांचा गावोगाव प्रचार करीत आपल्या तारुण्याची वर्षे समर्थांनी महाराष्ट्राला संघटित करण्यात व्यतीत केली. नंतर महाबळेश्वरी कायम वास्तव्य करून शिष्य निर्माण केले व 'महाराष्ट्र धर्मा'चा प्रचार केला. शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेचा प्रचंड उद्योग एकीकडे चालू होता तर त्याचवेळी महाराष्ट्रीयांमध्ये धर्माभिमान, चारित्र्य यांचे महत्त्व वाढविण्याचे व लोकांना संघटित करण्याचे कार्य समर्थ रामदासस्वामी करीत होते. जरी त्या दोघा विभूतींची भेट सन १६७२ त म्हणजे शिवराज्याभिषेकाच्या आधी दोनच वर्षे इतक्या उशीरा झालेली असली तरी रामदासस्वामींचा प्रभाव शिवप्रभूंच्या मनावर एवढा पडला की त्यांनी आपले राज्य त्यांच्या झोळीत टाकले, आणि स्वामींनी ते परत करून फक्त झोळीच्या रंगाचे भगवे निशाण त्यांना दिले, व तोच महाराष्ट्राचा भगवा ध्वज होय!

समर्थ रामदासस्वामींनी प्रपंच कसा करावा, वागावे कसे, लिहावे कसे शत्रूशी कसे वर्तन करावे कसे रहावे, इत्यादि व्यवहारिक उपदेश केला तो प्रापंचिकांना उपयुक्त आहेच. त्याबरोबरच त्यांचे नैतिक व आध्यात्मिक जीवनही उन्नत व्हावे म्हणून आपला ग्रंथराज 'दासबोध' त्यामध्ये, अनेक 'समास' लिहिले आहेत. श्रेष्ठराजा म्हणजे शिवाजी, व श्रेष्ठ राजगुरु म्हणजे रामदासस्वामी; या दोघांच्या पवित्र-संयोगातून महाराष्ट्राची अस्मिता घडविली गेली आहे. म्हणून त्या दोहोपैकी एकाचे स्मरण करताना दुसऱ्याचे स्मरण अपरिहार्य आहे.

देशाच्या आजच्या भीषण परिस्थितीत, नैतिकतेच्या अवनत अवस्थेत, राष्ट्रीय जीवन कलंकित होत असताना श्रीसमर्थांचें पुण्यस्मरण करून व त्यांना वंदन करून त्यांच्या उपदेशाचे आचरण केल्यास सर्व संकटांवर आपले लोक मात करू शकतील. रामदास स्वामींनी आपणाला दिलेला वारसा अमोल, असामान्य व अलौकिक दिव्य आहे, त्याचे जतन आपल्या कल्याणासाठीच केले पाहिजे ✰

# श्री साईबाबांचे जागृत देवस्थान
# श्रीसाईनाथ मंदिर—भिवपुरी रोड

लेखक :—श्री. चंद्रकांत दामोदर सामंत



मध्यरेल्वेच्या मुंबई–पुणे मार्गावर कर्जत रोड जंक्शनच्या अलीकडील स्टेशन म्हणजे 'भिवपुरी रोड' होय. ह्या स्टेशनच्या पूर्वेस श्रीसाईबाबांचे बऱ्याच वर्षांपासूनचे एक मंदिर आहे. सदर मंदिराकडे जाण्यास जवळचा पायवाटेचा मार्ग शेतातून जात असून मंदिर 'भिवपुरी रोड' स्टेशनापासून केवळ पाचसात मिनि

टांच्या अंतरावरच आहे. ह्या मंदिराच्या उभारणीचा इतिहास अतिशय मनोरंजक असून साईभक्तांना तो उद्बोधक वाटेल.

ह्या मंदिराचे संस्थापक व श्रीसाईनाथांचे एक निष्ठावान उपासक कै. केशवराव रामचंद्र प्रधान हे आयुष्याच्या सुरवातीपासून नास्तिक व ईश्वरी अस्तित्व न मानणाऱ्यापैकी एक होते, हे आता कोणालाही सांगून खरे वाटणार नाही.



कै. श्री. केशवराव प्रधान

त्यांचे वास्तव्य त्यावेळी 'भिवपुरी रोड' येथेच असे. मुंबई येथील एक पारशी गृहस्थाच्या धंद्याच्या पेढीचे मुनीम ह्या नात्याने श्री. प्रधानांना वारंवार मनमाड, नाशिक, कोपरगाव वगैरे भागातून वसुलीनिमित्त फिरावे लागे. श्री. प्रधानांचे एक स्नेही श्रीसाईबाबांचे परम भक्त होते. त्यांचे शिरडीस वरचेवर जाणे येणे असे; व ते श्री. प्रधानांना आपल्याबरोबर शिरडीस येण्यासाठी वारंवार आग्रहाने बोलावित. श्री. प्रधानांचा कल त्या मार्गाकडे नसल्याकारणाने ते आपल्या मित्राच्या आग्रहाला सुरवातीस बळी पडले नाहीत. पण अखेरीस जाण्यास तयार झाले—पण एका अटीवर; 'मी तुमच्या साईबाबांच्या भेटीसाठी मशिदीत पाऊल ठेवणार नाही.' श्री. प्रधानांचे मित्र ह्या अटीला कबूल झाले; व एकदाचे श्री. प्रधान शिरडी मुक्कामी पोहोचले.

अगोदर ठरल्याप्रमाणे श्री. प्रधान खोलीवर राहिले व त्यांचे स्नेही नित्याप्रमाणे मशिदीत श्री बाबांच्या दर्शनाला गेले. मशिदीत अलोट गर्दी जमली होती. दुपारी बारा वाजता वाद्यांच्या व घंटानादांच्या समवेत श्री बाबांच्या आरतीला सुरवात झाली व सगळा भक्तगण भक्तिरसात आकंठ बुडून गेला. इकडे खोलीवर श्री. प्रधानांना उगीचच बेचैन वाटू लागले, व जसजसा घंटानाद वाढू लागला, तसतशी त्यांची अस्वस्थताही वाढीस लागली. अखेरीस मनाच्या ह्या बेचैन अवस्थेत श्री. प्रधानांना आपल्याच अटीचे विस्मरण झाले व ते तडक मशिदीत जाऊन दाखल झाले. तोपर्यंत आरती समाप्त झाली व भक्तमंडळी श्री बाबांच्या हातची उदी व प्रसाद घेऊन हळूहळू परतू लागली. थोड्याच अवधीत मशिद मंडप रिकामा झाला व तेथे श्री. प्रधानांखेरीज फारसे कोणी राहिले नाही. श्री. प्रधान मात्र आपल्याच तंद्रीत श्री बाबांकडे एकटक पाहात दूर बसले होते. बऱ्याच वेळाने श्री बाबांनी त्यांना आपल्याजवळ बोला-

वून घेतले व अकल्पितपणे दक्षिणेसाठी हात पुढे केला. सुदैवाने त्या समयी श्री प्रधानांच्या खिशात पेढीच्या वसुलीचे जमलेले सुमारे अडीच हजार रुपये होते. मागलापुढला काही एक विचार न करता त्यांनी मुकाट्याने सगळी रक्कम श्री बाबांच्या हातावर ठेवली व त्याच भारावलेल्या स्थितीत रिकाम्या खिशाने ते भिव्हंडी परतले.

काही वेळाने श्री. प्रधानांची उन्मनावस्था ओसरली व ते पूर्ववत भानावर आले. त्याचक्षणी त्यांना पैशाची आठवण झाली व आता पेढीवर जाऊन काय जाब द्यावयाचा ह्याची विवंचना पडली. त्यावेळी त्यांच्याकडे भिवपुरीस परतण्याइतपतही पैसे नव्हते. दरम्यान त्यांच्या स्नेह्यांनीही परत वाट धरली होती. पण परमेश्वरी कृपा झाल्यावर काय अशक्य आहे ? श्री. प्रधान कोपरगाव स्टेशनाकडे जाण्यासाठी एका टांग्यात बसले. मुक्कामाला पोहोचल्यानंतर भाड्याचे पैसे म्हणून त्यांनी टांगेवाल्यास हातातील अंगठी दिली व त्याचे भाडे वसूल करून घेण्यास सांगितले. तितक्यात अद्यावत् पोशाख केलेले एक गृहस्थ तेथे आले व त्यांनी श्री. प्रधानांची अडचण ओळखून त्या टांगेवाल्याचे पैसे चुकते केले, इतकेच नव्हे तर श्री. प्रधानांना मुंबईपर्यंतचे रेल्वेचे तिकीटही काढून दिले.

अशा रितीने भिवपुरीस परतल्यानंतर हिशोबाच्या धास्तीने श्री. प्रधान पेढीवर जाण्यास कचरू लागले व " प्रकृति बरी नसल्याकारणाने कामावर येऊ शकत नाही " अशा अर्थाचा निरोप त्यांनी मालकांना पाठविला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या मालकाकडून श्री. प्रधानांना उलट निरोप मिळाला की, " आपण वसुलीत मिळविलेले दुप्पट पैसे आम्हाला पोहोचले, तेव्हा प्रकृति साफ बरी होईपर्यंत रजा घ्यावी व आराम करावा. " श्री. प्रधानांना एक गोड धक्का बसला व श्रीसाईबाबांच्या अगाध लीलेचा आणखी एक साक्षात्कार झाला.

ह्या प्रसंगानंतर श्री. केशवराव प्रधानांचे एक निःसीम साईभक्तात रूपांतर झाले, व ते वारंवार शिरडीस जाऊ लागले. प्रत्येक वेळी ते श्रीबाबांना भिवपुरीस येण्यास गळ घालू लागले. असेच एकदा श्रीसाईबाबांच्या शाडूच्या तीन मूर्ति बनवून आणल्या. त्यातली एक मूर्ति श्रीसाईबाबांनी उचलून श्री. प्रधानांच्या स्वाधीन करून म्हटले, " ही घे व भिवपुरीला स्थापन कर. मी तेथे आहे असे समज. "

श्रीसाईबाबांच्या हातून प्रसाद म्हणून मिळालेली ती मूर्ति प्रधानांनी भक्तिभावाने भिवपुरीस नेऊन त्यांची योग्य प्रकारे स्थापना केली व यथाकाल तेथे एका प्रशांत व आल्हाददायक मंदिराची उभारणी झाली. भिवपुरीच्या श्रीसाईनाथ मंदिराचे हे एक आगळे वैशिष्ट्य आहे की तेथील मूर्ति ही खुद्द श्रीबाबांच्या हातून मिळालेला एक अमोल ठेवा आहे आणि श्रीसाईबाबांनी आपल्या आवडत्या भक्ताला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तेथील आपल्या वास्तव्याची प्रचिती वेळोवेळी आणून दिली आहे.

# श्रीसाई कृपेचा अनुभव

● सौ. पार्वतीबाई भिडे

जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचीत अनुभव ॥

परमपूज्य श्री सद्गुरु साईबाबांची प्रचिती त्यांच्या अनेक भक्तांना आलेली आहे व येत आहे. श्रीसाईलीला मासिकात हे अनुभव मला वाचावयास मिळतात. मला आलेला अनुभव खाली देत आहे. बाबांच्या कृपेचा लाभ व प्रचिती वेळोवेळी आम्हाला येते. त्यातील एक वरील आहे.

अजूनही तो दिवस मला आठवतो. प्रवासास कोठेही निघाले की ती आठवण होतेच. मी माझ्या मुलुंड येथील मुलीला भेटावयास गेले होते. तेथून मी पुण्यास येण्यासाठी निघाले. माझ्याबरोबर माझी लहान ५-६ वर्षांची नातही बरोबर आली होती. ठाणे ते पुणेची एक्सप्रेसची दोन तिकीटे काढली. गाडी वेळेवर सकाळी आली. पण गर्दी फार. जागा मिळणे कठीणच होते. माझे जावई आम्हाला पोचवावयास आल्याने त्यांनी आम्हाला कसेबसे गाडीत चढविले. आमच्या पिशव्या आम्ही चढताना हाती होत्याच, जागा मिळाल्याने हायसे वाटले.

कल्याण स्टेशनवर गाडी आली. माझ्या डब्यातील एका बाईने मुलाला खाऊ घेऊन दिल्याने मी माझ्या नातीला खाऊ घ्यावा म्हणून पिशवीतील पर्स घेण्यासाठी पिशवीत हात घातला. तो काय ? पिशवीत पर्स नाही. बाकी कपडे वगैरे जसेच्या तसेच होते. पर्स नाही याची खात्री होताच माझ्या डोळ्यापुढे काजवे चमकले. पैसे गेल्याचे दुःख नव्हते. पर्समध्ये आमची एक्सप्रेसची तिकीटे होती ती गेली. विचार चक्र सुरू झाले. माझ्या डब्यातील बाईने विचारले, "बाई काय झाले ?" मी म्हटले, "काय सांगू, पर्स गेली व तिकिटेही गेली. आमच्या बाकावरची मंडळी माझी झालेली तारांबळ पहात होतीच. नातही खाऊ दे म्हणत होती. तेवढ्यात एका बाईने माझे नातीला तिने नुकताच घेतलेला खाऊ दिला, त्यामुळे माझ्या नातीची समजूत पटली. पण !

माझ्या पर्समध्ये तिकीटे व १०-१२ रुपये व काही चिल्लर होती. पण त्याचा उपयोग नव्हता. गाडीत तिकीट चेकर असतात. आमचे डब्यात तिकीट चेकर आला व मग तिकीट मागीतले तर ! मी काय सांगू ? हरवली पर्स म्हणून सांगून त्यास खरे कसे वाटणार ? "बाई सुशिक्षित दिसता, तुम्हाला शोभत नाही" म्हणून बोलून त्याने शोभा केली तर ? आपण सभ्य घरातील माणसे. कधी कुणाचे बोलून घेतले नाही. पण यावेळी असे घडले तर ! या विचाराने डोके सुन्न झाले. वरील भीतीपोटी मी गांगरुन गेले.

माझे बाकावर एक सभ्य, वयस्क कुटुंब बसले होते. लोणावळा स्टेशन आले तेव्हा मी त्यांना म्हटले, " मला वीस रुपये द्या. मी अडचणीत सापडले आहे. सर्व तुम्ही पहात आहातच. माझा पत्ता टिपून घ्या. मी पुण्यास गेल्यावरोबर मनि-ऑर्डर करुन तुमचे पैसे लगेच पाठविते. नाही म्हणू नका." पण त्यांनी ऐकलं नाही व लोणावळा येताच ती मंडळी उतरुन निघून गेली. सहानुभूतीचा एक शब्दही ती बोलली नाहीत.

मी गांगरुन गेले. परमपूज्य साईबाबाच मला या अडचणीतून सोडवतील असे वाटून मी त्यांची मनोमन प्रार्थना केली व त्यांना हाक मारुन म्हटले " बाबा यातून मला तुम्हीच तारणार!" प्रार्थना करीत असताना माझे डोळ्यात अश्रू उभे राहिले.

तळेगाव स्टेशन आले. बाहेरुन कुठून तरी दोन सभ्य गृहस्थ आमच्या डब्यात आले व माझे बाकाचे समोर जागा रिकामी होती तेथे बसले. त्यांनी माझी झालेली तारांबळ पहाताच मला म्हणाले, " बाई कोठे उतरणार?" मी म्हटले, " पुणे स्टेशनवर." ते म्हणाले, ' बाई तुम्ही शिवाजीनगर स्टेशनवर उतरा. आमची शिवाजीनगरचीच दोन तिकीटे आहेत ती तुम्ही घ्या. काळजी करू नका" मी त्यांना म्हटले तुम्ही मला तिकीटे देऊन तुम्ही काय करणार! ते म्हणाले आमचे आम्ही पाहतो, म्हणून त्यांनी दोन तिकीटे माझे पुढे टाकून ते शिवाजी नगर स्टेश-नचे अलिकडेच १ फर्लांग अगोदर उतरुन निघून गेलेही. गाडी शिवाजी नगर स्टेशनचे अलीकडे चांगली १० मिनिटे उभी राहिली होती.

मला तिकीटे दिलेल्या गृहस्थाचे मी नाव विचारले, पण त्यांनी सांगितले नाही.. शिवाजी नगर स्टेशन आले. तिकीटे होतीच. आम्ही उतरलो. माझे डब्या-तील एक वयस्कर गृहस्थ, तेही उतरले. ते म्हणाले " बाई तुम्ही कोठे जाणार!' पर्स गेली रिक्षाला काय देणार! मी सदाशिव पेठेत जात आहे. तरी बसने चला.' तेवढ्यात माझा मोठा मुलगा माझ्या गाडीच्या शेवटच्या डब्यात होता. तोही उतरला. त्याने मला पाहिले तो धावतच आला. त्याने आई, आई म्हणून हाक मारली. त्याला पाहताच हायसे वाटले. मी माझ्या बरोबरच्या गृहस्थांना म्हटले ' माझा मुलगा भेटला. मी त्यांचे बरोबर जाते.' म्हणून आम्ही रिक्षा करून घरी आलो.

माझ्या अडचणीच्या वरील परिस्थितीत बाबांनी माझी प्रार्थना ऐकून मला दोन गृहस्थांचे रुपाने येऊन दोन तिकीटे शिवाजी नगरची देऊन मला संकटातून सोडविले अशीच माझी श्रद्धा आहे. आश्चर्य हे की सबंध ठाणे ते पुणेपर्यंत नेहमी येणारे तिकीट चेकर आमचे डब्यात आलेच नाहीत. कसे घडले! ही बाबांची कृपा!

## वाऱ्यावरचे विचार : ५ उमलू नकाच केव्हा

'स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाच केव्हा' आकाशवाणीवर ऐकले व मनाला चमत्कारिक वाटले. असं सांगणारा हा कवी आहे की कोण ? कळ्यांनी उमलू नये ! मग त्यांनी करावे तरी काय ? कळ्या असतानाच का मुके मरण स्वीकारावे ? काय ही दुष्ट कल्पना. असं मनात येतं येवढ्यात 'गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा' ही ओळ ऐकली मात्र तो मन कवीच्या कल्पकतेचे कौतुक करू लागले. कवीच्या उच्च कल्पकतेबद्दल व त्या ओळीत असलेल्या अध्यात्माबद्दल मनाला मोठा रम्यपणा वाटला. आपले अनुभव तपासून पाहिले तर हे कोणासही मान्य होईल की कवीच्या कल्पकतेने एक मोठं सत्य उघड केलं आहे. आपण म्हणतोच ना की चटका लावून गेला, चुटपुट लागली. तो चटका, ती चुटपुट अपूर्णतेतून जन्मास येते. म्हणून अपूर्णतेत गोडी आहे, सुख आहे. नाटक पहाताना गोडी वाटते, मन रमते. पण संपल्यावर ? संपलं म्हणून मन सुस्कारा टाकते. जीवनात अपूर्णता आहे म्हणून जगण्यात मौज आहे. युद्ध संपले नाही म्हणूनच जीवनाशी दोन हात करीत करीत विजयाच्या आशेने पुढे पुढे जातो ना ? नेहमीचं अगदी साधं उदाहरण घ्या की, खुसखुशीत चुरचुरीत खुमासदार असं एखादे भजं मिळाले तर जिभेला किती मौज वाटते व मनाला किती सुख वाटते. पण मन लगेच म्हणते एकच ? चुटपुटते. तीच ती चव जीभेवर नाचत राहते. त्यातच मन सुख मानते व अधिक मिळविण्याचा प्रयत्न करते. अपूर्णतेत आशावाद आहे. आशावाद प्रयत्नशील असतो. मुक्कामाचे ठिकाण आले नाही तो पर्यंत येणाऱ्या सुखाच्या आशेने आपण चालत राहतो. मुक्कामावर पोहोचल्यावर चालण्यातील मौज जाते. पोट पूर्ण भरल्यावर सुग्रास जेवणही नकोसे वाटते. म्हणून निसर्गाने हे विश्व अपूर्ण ठेवले आहे व त्याचे ज्ञानही मानवाला अपूर्ण दिले आहे. त्याच बरोबर सामर्थ्यशाली बुध्दीही निसर्गाने मानवाला दिली आहे. उद्देश हाच की अपूर्ण वाटणारे हे विश्व व त्याचें ज्ञान आपल्या बुद्धिच्या साह्याने पूर्ण करण्यात मानवाने सतत् प्रयत्नशील राहावे. ही गाडी सतत चालू राहावी म्हणून कितीही सुख मिळाले तरी ते अंती अपूर्णच ठरण्याची व्यवस्था निसर्गाने केली आहे. माणसाची बुद्धि, त्याचे अपूर्ण ज्ञान पूर्ण ज्ञान करण्याच्या नादी त्याला लावते. अपूर्णाला पूर्ण करण्याचा, अज्ञाताला ज्ञात करण्याचा छंद शास्त्रज्ञांना असतो. यामुळे नाना शोध लावून जीवन पूर्ण करण्याचा सतत प्रयत्न त्यांच्याकडून होत राहतो. अपूर्णाला पूर्ण करण्याच्या आशावादामुळे नवीन नवीन शोध लागत आहेत व जगाचे एक एक पाऊल पुढे पडत आहे, मानवाने नाना शोधांचा योग्य उपयोग केला तर त्याचे जीवन सुकर व सोपे होईल. अपूर्णतेतून प्रगतीचा जन्म होतो तो असा. कळी उमलताना सुवास येतो खरा पण ती पूर्ण उमलल्यावर थोड्या वेळात तो उडूनही जातो. अपूर्णतता जननी आहे तर पूर्णता मरण आहे. म्हणून अपूर्णतेत गोडी आहे.

—द. शं. टिपणीस

# श्रीसाईनाथ

## [ श्री सद्गुरु साईमहाराज ललित - चरित्र ]

० श्री. र. श्री. पुजारी, पुणे

### ४२. जो अनन्यशरण होऊन बाबांकडे आला त्याची चिंता बाबांना !

दुपारच्या वेळी माधवराव घरीच होते. काही कामात गुंतले होते. तोच बाहेरून कोणी हाक दिली, "काय आहेत का माधवराव घरात ?"

माधवरावांची पत्नी बाहेर आली. आलेल्या व्यक्तींना मानेनेच माधवराव घरी असल्याचे सांगितले. बैठकींवर बसण्याची विनंती केली. एवढ्यात माधवरावांची स्वारी समोर येऊन दाखल झाली.

माधवरावांचे सर्व अंग राखेने भरलेले होते. दोन तीन मोठ्या चाळण्या घेऊन उदी चाळण्याचे काम चालले होते. एका बाजूला वस्त्रगाळ उदी आणि दुसऱ्या बाजूला राखेतील बारीक-मोठे खडे असे दोन ढीग तेथे पडले होते. वस्त्रगाळ उदी भरून ठेवण्यासाठी घरातील तीन चार डबे रिकामे करून, स्वच्छ धुवून-पुसून ते त्यांनी एका बाजूला ठेवले होते.

माधवरावांचा तो अवतार पाहून काकासाहेब महाजनींना क्षणभर हसू आले. पण बरोबर असलेल्या परक्या इसमाच्या देखत माधवरावांशी थट्टेची सलगी करणे बरे नव्हे म्हणून ते स्वस्थ बसले, नंतर त्या गृहस्थांचा माधवरावांशीं परिचय करून देऊन कामाचे स्वरूप सांगण्यास काकासाहेबानी सुरूवात केली. व ते म्हणाले—

"गेली बारा वर्षे कोर्टकचेऱ्या यांच्या मागे लागल्या आहेत. त्यापायी त्यांना आपले घरदार गमवण्याची पाळी आली. तरी त्या दावेदारास यांची दयामाया येत नाहीं. यांचीं पाळेमुळे खणून यांच्या हाती चौपदरी दिल्याशिवाय त्याचा आत्मा थंड होणार नाहीं. या कोर्टप्रकरणी यांनी आणि यांच्या कुटुंबियांनी जो मनःस्ताप भोगला त्याला सीमा नाही. देव, देवऋषी सर्व करून झाले. परंतु त्या वैऱ्याच्या पाषाणहृदयाला पाझर फुटत नाहीं. आता अखेरचा उपाय म्हणून याने बाबांकडे धाव घेतली आहे. बाबांना यांची हकिगत तुम्हीं सांगितल्यास बाबा यांना दुःखमुक्त करतील अशा आशेने आणि श्रद्धेने ते येथे आले आहेत."

ही हकिगत ऐकून माधवरावांचे मन कळवळले. डोळे भरून आले. ते म्हणाले, "परपीडा देणे हा तर जगातील दुष्टांचा स्वभाव. अशा प्रसंगातून आपणा सर्वांनाच जावे लागते. पण सद्गुरूंची कृपा झाली कीं जखमेचा ठणका हलका होतो. दुःखाचा नाश होतो. आपली हकीगत बाबांना मी सांगेन. पण मी सांगणे हें केवळ लोकोपचाराचे. अंतर्यामी बाबा सर्वांची सर्व दुःखे जाणतात. आपणास त्यांनी येथवर आणले, ते आपल्या दुःखाचा परिहार करण्यासाठीच."

माधवरावांच्या या प्रेमळ आश्वासनामुळे त्या गृहस्थांचे डोळे भरून आले. ते म्हणाले, "पूर्वजन्मीचे काहीं पाप म्हणूनच त्या गृहस्थाची व माझी भेट घडली. त्याचे नुकसान तर कोणतेच नाहीं, उलट त्याचे कल्याण करण्याचा मी प्रयत्न केला. पण मी कायदेशीर दृष्ट्या अडचणीत सापडताच ते सर्व उपकार तो विसरला. लोभामुळे त्याची वृत्ती रक्त शोषणाऱ्या जळूप्रमाणे झाली. काट्याचा नायटा व्हावा त्याप्रमाणे एकातून अनेक दावे निर्माण झाले. अजगराच्या विळख्याप्रमाणे ते दावे आता मला रक्त ओकावयास लावीत आहेत."

माधवरावांच्या मनात अनेक जुन्या आठवणी जाग्या झाल्या.

सरदार काकासाहेब मिरीकरांचे चिरंजीव बाळासाहेब. कोपरगावचे मामलेदार. ते एकदा चिथळीच्या दौऱ्यावर असताना येथे आले. मशिदीत येऊन श्री बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. तेव्हा बाबा त्यांना म्हणतात कसे!—"अहो! ती आपली द्वारकामाई—आहे का तुम्हाला ठाऊक?"

बाळासाहेबांना बाबांच्या बोलण्याचा काहीच उलगडा होईना.

तेव्हा बाबाच पुढे सांगू लागले, "द्वारकामाई ती हीच की! ही मशीद! हिच्या मांडीवर बसलेल्या लेकराला कशाचे काय भय! कशाची काय चिंता तरी!"

अहो! भोळ्या भाविकांची ही आई! मोठी कनवाळू! मायाळू! कोणी कोठे संकटात सापडला की हिचा जीव थोडा थोडा झाला! अंगावर भान न उरून ही माय तशीच त्याच्या रक्षणाला धावली!

मग जो एकदा हिला चिकटला, हिची मांडी सोडून हालेनासा झाला, त्याच्यावरील प्रेम काय सांगावे! त्याचे सर्व दुःख, क्लेश, संकट दूर पळाले!

हे एक क्षणभर राहो. इतके प्रेम एखाद्याने तिच्यावर नाही केले, तरी जो एकदा तिच्याजवळ आला, तिच्या सावलीला विसावला, त्यालासुद्धा ती आपला मानील! उमज पडण्यापूर्वीच ती त्याला सुखाच्या सिंहासनावर नेऊन बसवील! मी काय म्हणतो!"

एवढे बोलून बाबांनी बाळासाहेबांच्या कपाळास आपल्या अंगठ्याने उदी लावली. डोक्यावर अभयहस्त ठेवला.

परंतु अजूनही बाबांना बोलायचे होते. म्हणून बाळासाहेबांना थांबविले. म्हणाले, "तो 'बावा' माहीत आहे का तुला? असा हातभर लांब असतो तो!"

स्वतःचा हात कोपरापर्यंत दाखवून बाबांनी केलेले हे वर्णन सर्पाचे आहे हे बाळासाहेबांच्या ध्यानी त्याच क्षणी आले.

बाबा आपण होऊनच पुढे सांगू लागले, "भयंकर——फार भयंकर असतो तो बावा! पण आपण या द्वारकामाईची पिल्ले, आपणाला तो काय करतो म्हणा!

सर्व काही पाहून घेणारी तिची ती समर्थ आहे! तारणारा बळकट असल्यावर

मारणाराचे हात किंवा दात कुठवर चालणार? आपण आपले स्वस्थ बसावे. गाढ्याचा खेळ पाहा! कसे?"

पण अशा गोष्टीचा खुलासा बाबांना विचारण्याचा धीर आहे कोणाला! बाबा बोलतील ते ऐकून घ्यावे आणि स्वस्थ बसावे.

उशीर झाला म्हणून बाळासाहेबांनी बाबांच्या चरणी पुन्हा मस्तक ठेवले, मशिदीच्या पायऱ्या उतरले. मीही त्यांच्याबरोबर पायऱ्या उतरलो. सभामंडपाच्या दारापर्यंत आम्ही जेमतेम पोचलो. तोच बाबांनी मला हाक मारली, "शामा! जरा इकडे वर ये रे."

बाळासाहेबांना तेथेच सोडून मी वर गेलो. बाबांची आज्ञा काय आहे ते कळण्यासाठी गुडघे टेकून तोंड थोडेसे पुढे केले. तेव्हा खासगीत सांगावे तसे खालच्या आवाजात बाबा मला म्हणाले, "शामा, तूही त्याच्याबरोबर जा. जा! जाण्याची तयारी कर. टांगा जातोच आहे, तर गंमत म्हणून मारून ये की तूही चिथळीला एक चक्कर!"

तावडतोब पायऱ्या उतरून मी खाली गेलो. बाळासाहेबाना म्हटले. "मीही येतो तुमच्या बरोबर टांग्यातून चिथळीला. हा काय मी आलोच घरी जाऊन! तयारी करून! बाबा म्हणाले: तूही जा त्यांच्या बरोबर चिथळीला."

बाळासाहेब मला म्हणाले, "कोठे शिरडी आणि कोठे चिथळी! माझ्याबरोबर इतक्या दूरगावी उगाच येऊन तुम्ही करणार काय! तुम्हाला मात्र उगाच धावपळीचा शीण!"

मी तसाच मागे परतलो. बाळासाहेबांचे म्हणणे बाबांच्या कानी घातले. तेव्हा बाबा म्हणाले, "तो तसे म्हणतो? मग बरेच झाले की! त्यात आपले नुकसान काय! नको जाऊस."

मंत्र, तीर्थ, देव, ब्राह्मण, वैद्य, ज्योतिषी आणि गुरु–यांच्या ठिकाणी ज्याचा जसा भाव, तसे त्याला फळ मिळणार! आपण मात्र नेहमी दुसऱ्याचे कल्याण चिंतावे. हिताच्या चार गोष्टी सांगून पाहाव्यात. त्याने ऐकले तर ठीकच. नाही ऐकले, तर तो आहे आणि त्याचे कर्म आहे.

एवढ्यात बाळासाहेबानांच वाटले की आपण बाबांची अवज्ञा करीत आहोत. गुरूची अशी अवज्ञा करणे चांगले नव्हे. तिची कटू फळे आपणास भोगावी लागतील. तेव्हा ते मला खुणेने म्हणाले, "चला."

साहजिकच बाबांची अनुमती पुन्हा घेणे आले.

ती घेण्यासाठी मी गेलो तेव्हा बाबा म्हणाले, "बरे, तो आता नेतो म्हणतो आहे ना? तर जा. ही नावाची मशीदमाई आहे. आपले नाव ही कशी घालवील? हिचे आतडे आपल्या लेकरांसाठी पुष्कळ तुटते. पण हे त्या लेकरांना कळायला पाहिजे ना? असो. कळेल तेव्हा कळेल."

बाबांच्या या आज्ञेमुळे मी पुन्हा बाबांच्या चरणी मस्तक ठेवले. उदी घेतली. निघालो. टांग्यात जाऊन बसलो.

चिथळीवर बाळासाहेबांच्या वरिष्ठ ऑफिसचे लोक येणार होते. ते अजून कोणीच आले नव्हते. उतरण्याची सोय तेथे मारुतीच्या देवळात केली होती. तेथे आम्ही गेलो. त्यांची वाट पहात बसलो.

रात्रीचे साडे नऊ दहा झाले असतील. सतरंजी आणि वळकटी टाकून आम्ही गप्पा मारीत बसलो. तेथेच एक वर्तमानपत्र होते. बत्तीच्या उजेडाला बाळासाहेब ते वर्तमानपत्र वाचू लागले. वाचनात अगदी गढून गेले. तोच एक भयंकर प्रसंग येऊन ठेपला.

एक मोठा साप कोठून आला; आला आणि बाळासाहेबांच्या कमरेवर उपरण्याचा मऊसा पदर होता त्यावर बसला. अगदी निर्धोकपणे चढून बसला.

तो वर चढत होता, त्यावेळी बाळासाहेबांच्या हातातील वर्तमानपत्राचा 'सुर सुर सुर' असा हलकासा आवाज येत होता. पण हा आवाज सापाच्या चढण्याचा आहे अशी शंका कोणाला येणार ? अशी विचित्र कल्पना करणार तरी कोण ?

साहजिकच बाळासाहेब वाचनात दंग ! मी शिरडीतील घडामोडींच्या विचारात दंग ! उरता उरला तो बाळासाहेबांचा पट्टेवाला. त्याला मात्र शंका आली. येणारा आवाज कोठून येत आहे, कशाचा येत आहे याचे तो बारकाईने निरीक्षण करू लागला. काही शंका येऊन बत्ती थोडी उचलून पाहातो तर हे लंबूमहाराज !

या महाराजाना पाहाताच त्या पट्टेवाल्याच्या अंगाचे पाणी पाणी झाले. जवळ जवळ बोबडी वळली. तरी पण त्यांच्या तोंडून कसाबसा एकच शब्द बाहेर पडला, "स-स साप !"

तेवढा एक शब्द मिरीकरानी ऐकला मात्र—त्यांचे हातपायच गळून गेले. घशाला कोरड पडली. भीतीने देहाला विकळा आली. लटलटा कापू लागले,

हे अचानक विघ्न पाहून मीही घाबरलो. मनात बाबांची प्रार्थना करू लागलो. म्हणालो, "बाबा, हे तुम्ही काय केले ? हे नसते लचांड आमच्या मागे का लावले ? आता ते तुम्हीच निस्तरा नाही तर आम्ही सर्पदंशाने येथे मेलो ! बघता बघता यमसदनी गेलो."

आमचा हा धावा बाबांच्या कानी लगेच गेला असेल. म्हणूनच की काय तो साप बाळासाहेबांच्या कमरेवरुन हळूहळू खाली उतरु लागला. मग कोठे आमच्या जीवात जीव आला. हातास लागेल ते ते आम्ही घेतले. जिवाचा धडा करून धावलो. एक-दोन-तीन-चार असे जोराचे घाव घातले. आणि ते धूड होत्याचे नव्हते केले. प्राणावर आलेले ते अरिष्ट बाबांच्या कृपेमुळे अशा रितीने टळले. गंडांतर टळले.

केवळ काही क्षणातच घडलेला हा सर्व प्रकार पाहून—आठवून बाळासाहेबांचे डोळे बाबांच्या आपणावरील प्रेमामुळे वाहू लागले. म्हणु लागले, "माधवराव, हे

पुढचे प्राणसंकट बाबांना आधी दिसले, म्हणूनच त्यांनी तुम्हाला माझ्याबरोबर येथे पाठवले. माझ्या इच्छेविरुद्ध पाठविले. खरोखर, सद्गुरु आपल्या शरणागताची चिंता किती परीनी वाहतात ते मला आज कळले. यापुढे बाबांचा शब्द मी कधीही ओलांडणार नाही."

ही गोष्ट बाळासाहेब मिरीकरांची तीन गोष्ट अमीर सकरची. श्रीमंत गोपाळराव बुटींची.

श्रीमंत बापूसाहेब बुटी संध्याकाळच्या सुमारास शौचकूपात गेले. तेथे एक लंबू महाराज हजर! बरे तर बरे, बापूसाहेबांचा त्याच्यावर पाय पडला नाही! जर पाय पडता, तर जिवंत रहाण्याची शक्यतच नव्हती!

पण बापूसाहेबांना बाबांनी आश्वासन दिलेले, "ज्योतिषी तुला काय सांगतो! आजचा दिवस तुला फार अशुभ आहे, जिवावर गंडांतर आहे म्हणून? खुशाल सांगू दे. मी तुला सांगतो : तुला काही होणार नाही. जा; खुशाल जा. काही काळजी करू नको."

अमीर सकरची गोष्ट तर याहूनही विस्मयकारक.

अमीर सकरला बाबांनी वातविकारापासून पूर्ण बरे केलेले. त्याच्या चाकऱ्या मनाला धडा शिकवून सन्मार्गावर आणलेले. तरी त्याची नऊ महिन्यांची सजा अजून पुरी व्हायची होती. त्यामुळे अजूनही तो चावडीतच रहात होता. अशा दिवसातील ही एक गोष्ट.

एक दिवस मध्यरात्रीच्या सुमारास बाबा ओरडत उठले. परम भक्त अबदुल्ला याला हाका मारू लागले, "अबदुल्ला! अरे अबदुल्ला! अरे, माझ्या उशागती केवढे हे भूत येऊन बसले आहे! बघ जरा—"

बाबा अबदुल्लाला हाकावर हाका मारू लागले. ओरडू लागले. हे ऐकून तेथे झोपी गेलेले सगळे लोक-फकीर, फुकरे, भिकारी; महारोगी सर्वजण जागे झाले. त्या सर्वांच्या मध्ये झोपलेला तो अमीर सकरही जागा झाला. बाबांचे बोलणे ऐकू लागला.

बाबा अबदुल्लाला म्हणत होते, "अरे, आत्ताच होते ना ते येथे! हातात बत्ती घेऊन कशाला मिरवतोस! नीट डोळे उघडून बघ."

अबदुल्लाने सगळे पुनः पुन्हा नीट पाहिले. पण त्यांच्या दृष्टीस काहीच पडले नाही. अबदुल्ला हातात बत्ती धरून तेथल्या तेथेच फिरतो आहे. बाबा मात्र उशाखालच्या सटका काढून त्याचे प्रहार एकसारखे जमिनीवर करीत आहेत!

या सर्व प्रकाराने तो अमीर सकर कातावला. जांभई देत म्हणाला, "आता आली आपत! ज्या अर्थी बाबा या अपरात्री उठून सटका जमिनीवर आपटत आहेत त्या अर्थी कोठेतरी एखादा साप नक्कीच असणार! हा आरडाओरडा,

सटक्याची ही आपटाआपटी म्हणजे समजावे की कोणाच्या तरी उशागती साप आहे।"

अमीर सक्कर आपल्या मनाशी एवढे म्हणतो आहे तो त्याच्याच उशाशी काही तरी हलताना दिसले! " अबदुल्ल! अरे, बत्ती रे बत्ती!" एवढे म्हणण्याचा अवकाश अबदुल्लाने बत्ती आणली. पाहातो तर एक भले मोठे वेटोळे घालून एक साप त्याच्याच उशीलाली शांतपणे बसलेला! डोळे मोठे मोठे करून त्याच्याकडेच पाहात असलेला!

माधवराव स्वतःशी म्हणू लागले. साक्षात मृत्यू उशाशी विळखा घालून काळ सर्पाच्या रूपाने बसला असतानाही ज्यांचे बाबानी रक्षण केले, असे आम्ही सर्वजण, त्यांचे बाळगोपाळ, सुखरूप असताना माझ्या समोरच्या या दुःखी माणसाचे भय-निवारण बाबा का करणार नाहीत? जो अनन्यशरण होऊन एकदा बाबांकडे आला त्याची सर्व चिंता बाबांना!

## ४३. ऋण-हत्या-वैर यांच्या परतफेडीशिवाय कोणाचीच सुटका नाही-

संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मशिदीत पुन्हा पुष्कळ मंडळी जमली आहेत. कोणी शारीरिक व्याधींनी जर्जर झाली आहेत. कोणी मानसिक व्याधींनी त्रस्त आहेत. अखेरचा उपाय म्हणून ही सर्व मंडळी मनात प्रश्न धरून आली आहेत. प्रत्येकाला वाटत आहे: मी इतका सच्छील, निर्मळ, सन्मार्गाने चालणारा, देवदेवतार्चन करणारा, मग ही पीडा माझ्या मागे का असावी? या जन्मी तर हातून एकही पाप घडले नाही. असें असताना ही शिक्षा मला का मिळावी? तिच्या-तून माझी सुटका आता होणार तरी कधी?

सर्व मंडळी अशी चिंताग्रस्त आहेत. मारायला काढलेल्या मेंढीप्रमाणें केविल वाणे चेहरे करून बसली आहेत. तोच बाबा कोणाला का रे भाऊ, का रे मामा, का रे तात्या, तू असा कष्टी का, म्हणून विचारीत आहेत. गमती गमतीच्या गोष्टी बोलून त्याना हसते करीत आहेत. जणू 'अल्ला मंतर, कोल्हा मंतर' करून, कसलासा 'छू' मंतर घालून त्यांची ठणकती वेदना बाबा हलकी करीत आहेत. चिंतेचा भार त्यांच्या डोक्यावरून खाली उतरवीत आहेत.

आज अकस्मातच बाबांना गोष्ट सांगण्याची लहर येत आहे. म्हणत आहेत, " फार जुनी कहाणी आहे. नीट ध्यान देऊन ऐका.

एक दिवस सकाळी नेहमीप्रमाणे मी न्याहरी केली. मग असाच एकटा निघालो. गावाबाहेरून एक चक्कर मारून यावी म्हणून बाहेर पडलो. खूप दूर गेलो. चालून अगदी थकलो. तर समोर एक नदी!

ती नदी केवढी म्हणाल, तर आपल्या राहात्याच्या नदीएवढी! पण नदीला पाणी होते. काठाला लव्हाळी होती. थोडीफार दाट झाडीही तेथे होती.

झुळझुळ वारा. गर्द सावली. स्वच्छ पाणी—मी अगदी खूष झालो. एका लहानशा पायवाटेने पाण्याजवळ गेलो. स्वच्छ हातपाय धुतले. तोंडावर पाण्याचा एक शिडकावा घेतला. उकडत होते, म्हणून स्वच्छ स्नान केले. मग बसलो. समोरचे सुंदर दृश्य पाहात तेथेच बसून राहिलो.

असाच काही वेळ मजेत गेला. मग चिलीम ओढण्याची हुक्की आली. खिशात हात घालून चिलीम काढली. चकमक काढली. छापी भिजवावी म्हणून पुन्हा त्या पायवाटेने पाण्याशी गेलो. तर कानावर बेडकाचा आवाज डरॉंव डरॉंव!

वर येऊन चिलीम पेटवली. आता दम मारणार, तोच समोर एक वाटसरू! माझ्या हातातील चिलीम मोठ्या आदराने धरून तो नम्रपणे म्हणाला, "महाराजांची स्वारी आज इकडे कशी? लई लांब झुकला देवा!"

तो वाटसरू पुढे म्हणाला, "मशीद आता लई लांब राहिली. ऊनही फार झाले. परत कोठे जाता? चला की माझ्या गरिबाच्या झोपडीवर. तेथेच आरामशीर चिलीम ओढ्. बाईच भाकरतुकडा खाऊ. मग इळभर निवांत करून ऊन खाली झाल्यावर सावकाशीने जा. काय घाई आहे? मीबी येईन संगे. शिरडीपावुर पोचवाया."

एवढे बोलून त्याने चिलीम पेटविली. ओढण्यासाठी माझ्या हातात दिली.

मी इकडे चिलीम ओढत होतो. तिकडे पाण्यात तो मघाचा बेडूक आक्रोश करीत होता. एखाद्या सापाने गिळण्यासाठी दातात धरावे तसा!

तो आक्रोश ऐकून त्या वाटसरूलाही राहवले नाही. तो मला विचारू लागला. तेव्हा मी म्हटले, "बाबा, तुला काय सांगू? हे त्याचे पूर्वजन्मीचे कर्म रे! ते आता हात धुवून त्याच्या पाठीशी लागले आहे. फार मोठ्या प्राणसंकटात सापडला आहे तो आता! पण ते कशाला? त्याची सर्व कहाणीच सांगतो तुला. ऐक. जसे करावे, तसे भरावे. मग कुरकुर का? रडारड का? रडून काय भोग सुटणार आहे?"

माझे बोलणे ऐकून त्या वाटसरूची उत्कंठा फारच वाढली. म्हणाला, "जातो जरा बघून येतो."

मी म्हटले, "काय बघतोस? एका मोठ्या सापाने एक बेडूक तोंडात धरला आहे. त्या बेडकाला तो साप आता गिळणार आहे."

—बाबांसमोर मशिदीत बसलेल्या त्या सर्व लोकानी भीतीने एक आवंढा गिळला. सर्वांच्या मनात एकाच वेळी एक विचार आला : म्हणजे माझी स्थिती सापाच्या तोंडातील त्या बेडकासारखी होणार की काय! हाय रे देवा! आता मेलो! पुरता ठार झाले शंकाच नको.

एवढ्यात क्षणभर थांबलेले बाबा पुन्हा बोलू लागले.

म्हणाले, " ते दोघेही महाहरामखोर ! गेल्या जन्मी त्यांनी फार अघोर कृत्ये केली. म्हणूनच त्यांना हा क्षुद्र जन्म मिळाला. सापाचा आणि बेडकाचा ! "

एवढ्यात तो वाटसरू वर आला. भयभीत होऊन म्हणाला, " बाबा, तुम्ही बोलला ते खरेच. केवढा जंगी तो साप आहे, त्याचा तो जबडा पाहूनच वाटले की मृत्यू आ वासून तेथे बसला आहे ! आणि तो बेडूक तरी केवढा अजस्र ! पण तो कितीही मोठा झाला तरी त्या सापापुढे काहीच नव्हे. बघता बघता तो साप त्याचा चट्टामट्टा करून टाकील ! फन्ना उडवील ! डोळ्यांनी पाहायला म्हणून त्या बेडकाचा एक तुकडाही तेथे शिल्लक ठेवणार नाही ! "

त्याचे बोलणे ऐकून मी म्हटले, " तू म्हणतोस ते खरेच आहे. पण मी आहे ना त्या सापाचा बाप येथे ! मी बरे त्याला असा खाऊ देईन ! मग एवढ्या दुरून, मशीद सोडून, उन्हातान्हाचा मी येथे आलो, तो कशासाठी ? कुणासाठी ?

अशा संकटप्रसंगी मी धाव घ्यायची नाही तर मी पाहिजे कशाला ! उघड्या डोळ्याने त्या बेडकाची दुर्दशा पाहायला ! आता पाहाशीलच तू ! त्याला कसा सोडवतो ते ! ती तेवढी सुटका झाली की आपण मोकळे ! मग खुशाल जाऊ तुझ्या घरी ! तोपर्यंत पुन्हा एकदा भर पाहू माझी चिलीम ! भर लवकर -- "

बाबांच्या पुढ्यात बसलेली ती दुःखीकष्टी माणसे बाबांच्या भयामुळे एकदम गहिवरली. मनाशी म्हणाली, दैन्याने आमची गत त्या बेडकाप्रमाणे केली असली तरी आमचे रक्षण करण्यास बाबा समर्थ आहेत. सुटकेचे जे आश्वासन त्यांनी दिले ते त्या बेडकाला नव्हे; आम्हा सर्वांनाच दिले आहे. आता चिंता कसली ? बाबा सांगतील ते सर्व आम्ही करू. त्यात यत्किंचितही कसर ठेवणार नाही.

बाबा पुढे सांगू लागले —

त्याने चिलीम भरली. आपण ओढली. मला ओढायला दिली. मग त्याला घेऊन त्या लव्हाळ्यातून मी खाली गेलो. तो भीतीने नको नको म्हणत असता त्या सापासमोर जाऊन मी उभा राहिलो. म्हणालो, " वीरभद्राप्पा ! अरे बाबा, तू सापाच्या जन्माला आलास ! तो तुझा वैरी बसाप्पा बेडकाच्या जन्माला आला ! तरी तुमचे हाडवैर अजून संपले नाही ? जुना पीळ अजून गेला नाही ? एवढी शिक्षा होऊनही वैर आता तरी सोडावे, एवढी अकल तुम्हाला अजून सुचत नाही ? मग सुचणार तरी केव्हा ? "

एवढे शब्द मी बोललो असेन नसेन, तोंडातील बेडकाला सोडून तो साप जो पळाला तो बुडी मारून खोल पाण्यात शिरून कोठे अदृश्यही झाला ! हे पाहून तो बेडूक टुणकन उडी मारून काठावर आला. जीव घेऊन झाडीत कोठे पळाला ! जणू साक्षात मृत्यूच्या मुखातूनच त्याची सुटका झाली होती !

एका क्षणात घडलेला हा सर्व प्रकार पाहून तो वाटसरू चकित झाला. मला विचारू लागला, "या दोघातील वीरभद्राप्पा कोण? बसाप्पा कोण? यांच्यात एवढे वैर का पडले? ती सर्व हकिगत देवा, मला सांगा. मी फार उत्सुक आहे."

मी त्याला म्हटले, "आधी त्या झाडाखाली जाऊ. चिलीम ओढू. मग निवांतपणे ती सर्व हकिगत मी तुला सांगेन."

आम्ही दोघे त्या झाडाखाली आलो. त्या घनदाट, शीतळ सावलीला बसलो. चिलीम चांगली शिलगाविली. एकदा तो, एकदा मी अशी चिलमीची नामी देवघेव सुरू झाली. ती होत असतानाच मध्ये मध्ये जो वेळ मिळे त्यावेळी ती सर्व रोमहर्षक कथा मी त्याला सांगितली.

तीन पिढ्यांमधील स्वार्थ, लोभ, मत्सर यांची ही हकिगत ऐकून तोही थक्क झाला. म्हणाला, 'एकूण ऋण, हत्या आणि वैर यांच्या परत फेडीशिवाय कोणाचीच सुटका नाही तर! पण या सर्व अनर्थांचे मूळ कारण एकच दिसते—पैसा!"

मी सांगितलेल्या त्या दीर्घ कथेचा आशय त्याच्या ध्यानी आला हे पाहून मला बरे वाटले.

मी त्याला म्हटले, "माणसांचा व्यवहार हा असाच मलिन असतो. हेवे-दावे एकमेकांचे गळे काटू पाहातात. पण त्यातही एक सोय-सवड देवाने ठेवली आहे. जो दीन, अनाथ, शरणांगत, त्याच्या सुटकेसाठी प्रत्यक्ष अल्ला धावून येतो. अर्थात हे काम तो कोणा माणसातर्फे करवून घेतो. त्या गरीब बेडकाचा जीव रक्षण करण्यासाठी अल्लाने आज मला कसे पाठविले? तसे एखादे माणूस पाठवून!"

मशिदीतील त्या शरणागतांचे डोळे अश्रूंनी वाहू लागले. त्या अश्रूंत त्यांचे सर्व पाप धुवून गेले. मन स्वच्छ झाले. शांत झाले.


## श्रीसाईनाथ रोजनिशी

शके १८९७ ( १९७५-७६ )

येत्या गुढीपाडव्याच्या दिवशी इंग्रजी व मराठीत थाटात प्रकाशित होणार.

श्रीसाईबाबांचे शिलाखंडावर अधिष्ठित तिरंगी मनोहर फ्रेम करण्यालायक छायाचित्र.

श्रीबाबांचे संक्षिप्त चरित्र, श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीत काय काय पहाल श्रीबाबांचे समकालीन संत व त्यांची माहिती. ठिकठिकाणाहून शिर्डीत जाण्याचे मार्ग

श्रीसाईसमाजांचे संपूर्ण पत्ते. श्रीबाबांचे बोल, शिर्डीतील प्रमुख उत्सव, बाबांच्या आरत्या, समाधि मंदिर, द्वारकामाई, गुरूपादुकास्थान इ. ची आर्ट पेपर वरील छायाचित्रे, आकर्षक वेष्टन, संग्राह्य माहिती.

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

लेखक: होरालंकार शं. वा. देवधर, दादर, मुंबई

(मंगळ पुढे चालू)

(८) जन्मकुंडलीमध्ये अष्टमस्थानी मंगळ असेल तर आयुष्यात अपघात, शस्त्रक्रिया यासारख्या गोष्टी होण्याचा संभव असतो. आगीपासूनही भय असते. पण एकटा मंगळ बहुधा धोका देत नाही. तो हर्षल, शनि किंवा चंद्र ह्यांच्या युतीत असेल तर मात्र वरील गोष्टी घडतात. शस्त्रापासून भीती असते.

(९) जन्मकुंडलीमध्ये नवमस्थानी मंगळ असेल तर तो मनुष्य धार्मिक आचरण करीत नाही. प्रवासात धोका उत्पन्न करतो. चांगल्या राशीत तो भाग्योदय करतो. त्याच्यावर गुरूची दृष्टी असेल तर भाग्य उदयाला आणतो. परदेशगमन घडते.

(१०) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी मंगळ असेल तर मनुष्य तेजस्वी व तापट वृत्तीचा होतो. कोणतेही काम अत्यंत चिकाटीने व निश्चयाने करतो. तो महत्वाकांक्षी असतो. मेष, वृश्चिक राशीत असेल तर अधिकारी होतो. शनि मंगळ असतील तर नोकरीत अपमान व बडतर्फी होण्याचे भय असते. तो मनुष्य लोकमताची पर्वा करीत नाही. धाडस व स्पष्टवक्तेपणा हे गुण अंगी असतात. स्वतःच्या शक्तीपेक्षा मोठे उद्योग हाती घेतो. त्याचे हातून जनतेची सेवा घडते.

(११) जन्मकुंडलीमध्ये एकादश स्थानी मंगळ असेल तर सांपत्तिक लाभ चांगले होतात. हा मंगळ शुभराशीत असला पाहिजे व त्यावर शुभग्रहाची दृष्टी असावी लागते. पापग्रहाची दृष्टी असेल तर व्यसनाधीन बनून पैशाची उधळपट्टी करील. हा मंगळ संततीला पीडा व अपाय करणारा आहे. कर्क व मीन राशीत असताना दारूचे व्यसन लागेल.

(१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादशस्थानी मंगळ असेल तर पैशाची नेहमी टंचाई भासेल. खर्च प्रमाणाबाहेर होईल, कर्जबाजारीपणा उत्पन्न करील. बोलण्यामुळे व लिखाणामुळे संकटे उत्पन्न करील. लग्नामध्ये अडथळे उत्पन्न करील. पापग्रहांनी युक्त असता कारावास भोगण्याचे प्रसंग येतील. हे व्ययस्थान असल्यामुळे पैशाचा अवास्तव खर्च होईल.

## बुध

(१) जन्मकुंडलीमध्ये लग्नी बुध असता मनुष्य विद्याव्यासंगी असतो. बोलका व हसतमुख असतो. सहसा कोणाशी त्याचे वैर नसते. शांत व भिडस्त स्वभाव, चतुर वक्तृत्व यामुळे लोकप्रिय होतो. चेहऱ्यावर बुद्धीचे तेज दिसते. मिथुन, कन्या, तूळ, कुंभ या राशीत वरील फळे स्पष्ट दिसतील. शनि–बुध असतील तर स्वभाव कपटी, मंगळ–बुध असतील तर तापट असा स्वभावात फरक होतो.

(२) जन्मकुंडलीमध्ये द्वितीय स्थानी बुध असता तो मनुष्य वक्ता होईल, तो शुभराशीत असला पाहिजे. तो लेखनात प्राविण्य मिळवील. त्याच्यावर शुभ ग्रहाचा योग असेल तर वकिली व शिक्षक होण्यास चांगला. शुक्र-बुध असतील तर गायन, वादन, सिनेमा वगैरे धंद्यात लाभ होईल. बुध-मंगळ असतील तर यंत्र कारखाने वगैरे पासून प्राप्ती. पण या योगामुळे चोरीला जाईल.

(३) जन्मकुंडलीमध्ये तृतीयस्थानी बुध असेल तर लेखन व्यवसाय व ग्रंथ प्रकाशन यामध्ये किर्ती मिळवितो. ज्योतिषशास्त्र त्याला आवडते. त्याला अनेक गोष्टींचा संग्रह करणे आवडते. मंगळाशी शुभ योग झाला असेल तर गणित विषयात डोके चालते. गुरुच्या शुभ योगामुळे शास्त्रीय विषयाचे ज्ञान चांगले होते. हर्षलमुळे बिघडला तर निरुत्साह उत्पन्न होतो.

(४) जन्मकुंडलीमध्ये चतुर्थ स्थानीं बुध असेल तर वाहन सौख्य चांगले मिळते. मिथुन व कन्या राशीत हा बुध फार चांगले फल देतो. बुध शनिने बिघडला तर मातृसौख्य कमी मिळते. मंगळाने बिघडला तर नेहमी चिंता उत्पन्न होते.

(५) जन्मकुंडलीमध्ये पंचम स्थानी बुध असेल तर संतती योग लवकर येतो. पण मंगळ, शनि, हर्षल यांच्याशी युती असल्यास मुलांमध्ये व्यंग असते. विद्येला हा बुध चांगला. गणित व अंकशास्त्रामध्ये प्राविण्य मिळवितो. पंचम स्थानच्या बुधावर शुभ ग्रहाची दृष्टी असणे आवश्यक असते.

(६) जन्मकुंडलीमध्ये षष्ठम स्थानी बुध असेल तर मनुष्याने शरीर प्रकृतीची काळजी घ्यावी. कारण येथील बुध बिघडलेला असेल तर अपचनाचे रोग होतात. नेहमी निरनिराळी औषधे घेण्याची वाईट सवय जडलेली असते. हे लोक बहुतेक कारकुनी करतात. हा बुध मंगळाने बिघडला तर मानसिक दृष्टया वाईट, एकटाच बुध असेल तर मात्र चांगला असतो.

(७) जन्मकुंडलीमध्ये सप्तमस्थानी बुध असेल तर विवाह लवकर करणारा होतो. विवाहाचा जोडीदार बडबड्या, बुध्दीमान, वर्ण काळसर असा असतो. शनि बुध एकत्र असतील तर अशांचा विवाह यशस्वी होत नाही. व व्यापारात व भागीदारीमध्ये नुकसान होते.

(८) जन्मकुंडलीमध्ये अष्टम स्थानी बुध असेल तर मानसिक दौर्बल्य दिसून येते. हा बुध व्यापाराला चांगला. ह्या बुधामुळे दीर्घायुत्व मिळत नाही, शुभ ग्रहाची दृष्टी असेल तर स्त्रीधन मिळेल.

(९) जन्मकुंडलीमध्ये नवमस्थानी बुध असता मनुष्य वक्तुत्वसंपन्न व उच्च शिक्षित होतो. धर्म, तत्त्वज्ञान हे आवडतात. शुक्राचा शुभयोग झाला तर गायन वादन वगैरे कला ह्यात प्राविण्य मिळेल. गुरु शुभयोगात असेल तर लेखनकार्य होईल. विशेषतः प्रवासवर्णन लिहील. ह्या बुधामुळे कीर्ती व दीर्घ प्रवास होईल.

(१०) जन्मकुंडलीमध्ये दशमस्थानी बुध असेल तर विद्याव्यासंग करण्याची आवड, चांगल्या लोकांची संगती व लोकोपयोगी कामे घडवून आणतो. नोकरीत कारकुनीपासून आरंभ होतो. हा बुध शनिमुळे बिघडला तर लुच्चेगिरी, खोटे बोलणे अप्रामाणिक व्यवहार इ. घडतात. मंगळाने पिडीत असेल तर तो मनुष्य थापाड्या आहे असे नक्की समजावे. बडबड करणे हा त्याचा धर्म. पण गुरुने शुभ संबंधित असेल तो सन्मार्गाने नोकरी करणारा, शिक्षणक्षेत्र, धर्म, तत्त्वज्ञान याकडे वळणारा असतो.

(११) जन्मकुंडलीमध्ये एकादशस्थानी बुध असेल तर त्याला चांगले लाभ होतात. गायन कलेची आवड असते. एकाग्रता चांगली जमते. ज्योतिष, सामुद्रिक, गूढशास्त्र यांची आवड असते. त्यांची मैत्री त्यांच्याहून वयाने लहान असलेल्यांशी होते. विद्येमध्ये यश व संततीसौख्य चांगले मिळते. बुधाची पापग्रहाशी युति किंवा वाईट दृष्टी असेल तर वाईट मित्र मिळतात. लेखनामुळे गैरसमज होतात. हे लोक प्राप्तीपेक्षा कमी खर्च करतात.

(१२) जन्मकुंडलीमध्ये द्वादशस्थानी बुध असेल तर गूढ विद्येचा अभ्यास व संशोधन कार्य त्याचे हातून होते. पापग्रहांच्या दृष्टीस असल्यास बंधनयोग येतात. शनिने युक्त असल्यास लेखनामुळे कारागृहवास भोगावा लागतो. मंगळाने बिघडलेला असेल तर बालवयापासून दृष्टी अधू व जाड काचेचा चष्मा लावावा लागेल. राहू, केतू, मंगळ, हर्षल यांच्या युतीत हा बुध असेल तर कर्जबाजारीपणा येईल. दिवाळे काढणारे व्यापारी अशा योगावर जन्मतात.

## गुरू

हा शुभ ग्रह आहे. सर्व ग्रहांमध्ये याला फार महत्व आहे. त्याचे मुख्य काम विस्तार करते, समृद्धी घडविणे हे आहे.

(१) जन्मकुंडलीमधे लग्नी गुरू असता अंगकांती चांगली असते. चेहऱ्यावर आनंदीवृत्ती दिसते. वय वाढत जाते तसा स्थूलपणा येतो. मिथून-कुंभ राशीत येथे गुरु असेल तर प्राध्यापक, शिक्षक होण्यास लायक असतात. लग्नातील गुरु विद्याव्यासंगी करतो. व्यवहारात उत्तम असते, व तो इतर अनिष्ट योग दूर करतो. कर्कराशीचा गुरु स्थूल प्रकृती देतो. वृश्चिक राशीचा गुरु भरपूर संतती देतो. मीन राशीचा गुरू संतती व संपत्ती दोन्हींचे सौख्य देतो. गुरू-शुक्र, गुरू-चंद्र, गुरू-रवि हे योग लग्नामध्ये होणे उत्तम.

(२) जन्मकुंडलीमध्ये द्वितीय स्थानी गुरू असेल तर सांपत्तिक भरभराट घडवून आणतो. त्याला उत्तम अन्न मिळते. कुटुंब समाधानी असते. कर्क राशीचा गुरू स्थावर इस्टेट देईल. त्याला नोकरी चांगल्या दर्जाची मिळेल. स्निग्ध व सात्विक पदार्थ त्याला आवडतील. गुरू-शनि, गुरू-मंगळ, गुरू-राहू यांची युति

असेल तर संपत्तीचा नाश घडवून आणतील. एकंदरीत आर्थिक दृष्टीने चांगला असतो.

( ३ ) जन्मकुंडलीमध्ये तृतीय स्थानी गुरू असेल तर मित्र चांगले मिळतील. विशेष पराक्रम न करता त्याचा भाग्योदय होतो. भाऊ जास्त असतात. तो नातेवाई-कांशी आपुलकीने वागतो. धनु व सिंह राशीत हा गुरु चांगली फळे देतो. तो उदार व खेळाडू वृत्तीचा असतो. सार्वजनिक कामात पुढे येतो. रवि-चंद्र-बुध यांचा शुभयोग झाल्यास विद्येत असामान्य यश, शनिशी अशुभ योग झाला तर, भावंडांशी तंटे, गुरू-शुक्र योग कलेची आवड. असे योग उत्पन्न होतात.

( ४ ) जन्मकुंडलीमध्ये चतुर्थस्थानी गुरु असेल तर संसारीक सौख्य, गृह-सौख्य भरपूर मिळेल. शेवटचे आयुष्य सुखासमाधानात जाईल. वडिलांची स्थिती चांगली राहील. समाधानी वृत्ती राहील. गुरुबरोबर मंगळ, शनि, राहू वगैरे असतील तर घरदार व वहानसौख्य मिळेल पण आईवडिलांचे सौख्य कमी मिळेल.

( ५ ) जन्मकुंडलीमध्ये पंचमस्थानी गुरु असेल तर तो फार महत्त्वाचा आहे हा भाग्य योग आहे. पंचम स्थान हे संतती व विद्या यांचे दर्शक स्थान आहे. सत्पुत्रांचे सौख्य मिळेल. उत्तम अध्यापन, उत्तम लेखन, उत्तम शिक्षण ही फले हा गुरू देतो. मेष, सिंह, धनु राशीत असता खेळामध्ये प्राविण्य मिळते. मिथून, तूळ, कुंभ राशीमध्ये असता सर्व विद्यात प्राविण्य मिळवू शकेल मग गणित असो, कायदा असो, तत्वज्ञान असो अगर भाषा असो. जी शास्त्रे बुध्दीने जाणावयाची असतात त्या शास्त्रांमध्ये प्राविण्य मिळवील तो बहुतेक प्राध्या-पक, लेखक, कवी या क्षेत्रांमध्ये प्राविण्य मिळवील. परंतु हा गुरु शनि, मंगळ, हर्षल, राहू यांनी बिघडलेला असेल तर वरील गोष्टीमध्ये अडथळे निर्माण होतील. विद्या अर्धवट राहील. परिक्षेच्या वेळी आजारी पडेल. शिवाय तो मनुष्य जुगारी बनण्याची भीती राहील.

मेष, सिंह, धनु राशीला गुरू असता अल्प संतती राहील. मात्र मुले बुद्धिमान निपजतील. शनि, मंगळ, हर्षल यांनी बिघडला असता मुले उशीरा होतील, होणारच नाहीत किंवा अल्पवयात ती जातील. गुरू–चंद्र, गुरू–रवि अशा युती असतील तर संतती, संपत्ती व भाग्य उदयाला येईल.

( ६ ) जन्मकुंडलीमध्ये षष्ठमस्थानी गुरू असेल तर प्रकृति निरोगी राहील. शरीर स्थूल राहील. वैद्यकीच्या धंद्याला हा गुरु पोषक आहे. हा गुरू मंगळ, अथवा शनिने बिघडला असेल तर रक्तदोष, अपचन, आमांश यामुळे त्रास होईल. नोकर वर्ग चांगला मिळेल. मामा व मावशी यांच्याकडून फायदा होईल.

# श्रीसाईबाबा आणि १६ आकडा

लेखक —पांडुरंग भुजबळ

माझे आयुष्यात १६ आकड्याचा प्रभाव श्रीसाईबाबांनी कसा पाडला त्याचे सविस्तर वर्णन मी खालीलप्रमाणे देत आहे.

१६ आकडा याची बेरीज १ + ६ = ७ अशी होते. माझे आयुष्यात १६ आकडा आणि श्री साईबाबा यांचे माझे अनुभवाने फार जवळचे संबंध आहेत. श्री साईबाबा स्वतः शिर्डीत वयाच्या १६ व्या वर्षी निंब वृक्षाचे खाली गुरु पादुका स्थानाजवळ प्रगट झाले व ते स्वर्गवासी होईपर्यंत शिर्डीत राहीले. आणि आज समाधीत त्यांचे अस्तित्व शिर्डीत आहे. याची जाणीव मला व पुष्कळ भक्तांना झाली आहे व होत आहे. श्रीसाईबाबांचे सचरीत्राचे ग्रंथावरून व इतर ग्रंथावरून श्रीबाबांना १६ आकडा फार आवडत होता हे सिद्ध झाले आहे. कारण पूर्वीचे काळी त्यांनी एका शेतकऱ्याकडून दोन शेळ्या विकत घेतल्या त्यावेळी त्यांची किंमत प्रत्येकी रु. १·५० होती. परंतु बाबांनी त्यांचा आवडता आकडा म्हणजे १६ रुपये प्रत्येकी देऊन त्या शेतकऱ्याचे समाधान केले. असा हा १६ आकडा श्री साई-बाबांचा अत्यंत प्रिय आहे. या बाबत माझा अनुभव खालीलप्रमाणे देत आहे.

मला दि. ६ मार्च १९६९ रोजी श्रीसाईबाबानी सातारा ते शिर्डी असा पायी प्रवास करण्याचा आदेश दिला. यावेळी मी कोयनेत नोकरीस होतो. माझी श्रीबाबांची भक्ती सन १९५० पासून चालू आहे. त्यावेळेपासून मी श्रीसाईबाबांची अखंड भक्ती करत आहे. त्यावेळी माझे कोयनेतील खोलीतील मित्र श्री. जे. आर नेरकर यांनी मला भक्तीबाबत पुष्कळसे मार्गदर्शन केले. व श्री बाबांनी त्यांचे मुखातून माझेवर मांसाहार न करण्याचा लकडा लावला. पुढे काही दिवसानी मी श्री. नेरकर, श्री खुर्द, श्री मोरे यांचे समक्ष रात्री १०·३५ वाजता श्री बाबांच्या उदीची शपथ घेऊन मांसाहार व मद्यपान आजन्म वर्ज्य करण्याचा निर्धार केला आणि काय चमत्कार, थोड्याच दिवसात श्री साईबाबांनी माझेवर कृपा करून मला आशीर्वाद दिला व शिर्डीस पायी येण्याचा आदेश दिला. ती तारीख ६–३–१९६९ होती, आणि त्याच दिवशी मी शिर्डीस, सातारा म्हणजे माझे राहाते घरापासून पायी जाण्याची श्री साईबाबांचे चरणी मान्यता दिली व मी त्या दिवसापासूनच प्रवासाचे तयारीस लागलो. आता प्रवासास केव्हा निघावयाचे याचे श्री बाबांचे फोटोपुढे उभे राहून चिंतन करीत असताना मला श्री बाबांनी आदेश दिला की श्री गजाननाचे स्थापनेनंतर दुसरे दिवशी तू शिर्डीचे पायी प्रवासास निघावे. त्याप्रमाणे मी पंचांग काढून पाहिले असता श्री गजाननाचे स्थापनेनंतर दुसरा दिवस म्हणजे ऋषीपंचमी दिनांक १६–९–१९६९ अशी तारीख निघाली. म्हणजे मला श्रीसाईबाबांनी आपला अत्यंत आवडता आकडा १६ हीच तारीख मला प्रवासास सुरवात करण्यास

दिली. या दोन्ही आकड्यांची बेरीज ७ होते. त्या प्रमाणे मी सर्व तयारीनिशी दि. १६–९–१९६९ रोजी शिर्डीस श्री साईबाबांचे दर्शनासाठी पायी निघालो आणि ९ मुक्काम करून मी पुणे संगमनेर मार्गे शिर्डीस दि. २७–९–६९ रोजी दुपारी १२ वाजून २० मिनिटानी पोचलो. त्यावेळी श्री बाबांची दुपारची आरती चालू होती. मी श्री साईबाबांना साष्टांग नमस्कार घातला व त्यांना प्रसाद देऊन मी समाधान पावलो. श्रीसाईबाबांनी मला रस्त्यात फारच अनुभव दिले. ते सर्व या लेखात वर्णन करणे योग्य नाही, पण मी " माझा शिर्डीचा पायी प्रवास " ही लेखमाला श्रीसाईलीला मासिकातून प्रसिद्ध करणार आहे. मी शिर्डीला पोहोचलो ती तारीख २७–९–१९६९ अशी आहे, व निघालेली तारीख १६ म्हणजे १ + ६ = ७ आणि पोहचलो ती तारीख २ + ७ = ९ म्हणून दोन्हीची बेरीज केली तर ती ७ + ९ = १६ होते. यावरून मी असे समजलो की, श्रीसाईबाबांनी माझेवर आपल्या १६ व्या आवडत्या अंकाचा वर्षाव करून मला उपकृत केले आहे. दुसरा एक अनुभव असा की माझ्या नातेवाईकाचा मुलगा हा रागावून घरातून निघून गेला होता. ती वेळ म्हणजे आम्ही कोयना भूकंपातून सातारा येथे रहाण्यास आलो ते साल डिसेंबर १९६७. आम्ही श्री साईबाबांचे कृपेने भूकंपातून कोणतेही नुकसान न होता सुखरूप पार पडलो. मी अभिमानाने सांगतो की श्री साईबाबा कृपेने माझे घर पडले नाही व नुकसान झाले नाही इतकेच काय पण माझे मित्र श्री ननावरे यांची मुलगी ढीगाऱ्याखालून काढण्यान अत्यंत धोकादायक अशी मेहनत घेतली त्याचे सविस्तर वर्णन दैनिक सकाळ दि. १९-१२-१९६७ चे अंकात आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे श्री बाबांचे कृपेकरून माझे १ पैसाही नुकसान झाले नाही इतके बाबा माझे पाठीशी आहेत याची मला प्रचिती आली. एवढे सर्व झाल्यानंतर मी डिसेंबर १९६७चे अखेरीस श्री शिर्डीस साईबाबांचेकडे जाण्याचे ठरविले पण इकडे तर मुलगा बेपत्ता, काय करावे काय सुचेना आणि माझा तर जीव श्रीसाईबाबांचेकडे लागला होता आणि नातेवाईकांचा जीव त्यांचे मुलाकडे पण आर्थिक दृष्टया कमकुवत असल्यामुळे मी तो कोठे आहे हे माहीत नसल्याने कोठेच हिंडलो नाही पण त्याची चिंता सारखी लागली होती व इकडे श्रीबाबांची दर्शनाची ओढ लागली होती मन हिंदोळ्याप्रमाणें झोके घेत होते काय करावे काही सुचत नव्हते. हे सर्व बाबा जाणीत होते व माझी तळमळ ते पहात होते. असे असताना एके दिवशी मी दुपारी १२ वाजून ४० मिनीटानी पलंगावर चिंताग्रस्त स्थितीत पडलो असताना व पत्नी व मुले घरात असताना एक वेडसर मनुष्य माझ्या घरात पायऱ्या चढून आला आणि मला म्हणाला, " पाणी दयो, पाणी दयो." त्याप्रमाणे माझी मुलगी चि. जयश्रीने त्यास पाणी दिले. तो पाणी प्याला व भांडे खाली ठेवले

व मला म्हणाला, " ७ कि ९ " असे दोन वेळा म्हणून पायऱ्या उतरुन नाबडतोब निघून गेला. मला याचा अर्थ त्यावेळी काही समजला नाही. मी त्याचा विचार केला नाही कारण माझा जीव सारखा श्रीसाईबाबांचे भेटीसाठी तळमळत होता. पण काय संध्याकाळी चार वाजता मी घराबाहेर पडलो असता मला एकाएकी आत्मज्ञान झाले ते असे की, " मुलगा निघून गेल्यापासून ७ वे दिवशी त्याचे ठिकाण समजेल, व ९ व्या दिवशी तो घरी येईल असा दृष्टांत झाल्याबरोबर मी आनंदी झालो कारण श्रीसाईबाबांना माझी तळमळ माहीत होती म्हणून त्यांनीच बावळट वेषात येऊन मला सांगून गेले. त्यानंतर दुसरे दिवशी सकाळी मी त्यांचेकडे गेलो आणि त्यांना सांगितले की तुमचा मुलगा निघुन गेल्यापासून ७ वे दिवशी तुम्हाला त्याचा पत्ता लागेल व ९ वे दिवशी मुलगा घरी येईल असा मला दृष्टांत झाला आहे. पण ह्या गोष्टीवर कोणीच विश्वास ठेवला नाही पण मी मात्र विश्वास ठेवला आणि त्यांना सांगितले की मी शिर्डीहुन परत येईन त्याचे आत तुमचा मुलगा परत येईल व मी श्रीबाबांचा प्रसाद प्रथम त्याचे मुखात घालीन मगच मी इतराना प्रसाद वाटेन असे सांगून मी दुसरे दिवशी सकाळी शिर्डीस जाण्यास निघालो. शिर्डीत श्रीसाईबाबांची सेवा केली २ दिवस राहीलो व परत निघालो पुण्यात समजले की मुलगा एका गावामध्ये आहे असे त्याचे पत्र आले आहे ते बरोबर ७ व्या दिवशी त्याचे आईस समजले व लगेच त्याचे चुलत्याने जाऊन त्याला आणले तेही नेमके ९ व्या दिवशी. नंतर मग मी घरी सातारला आलो व दुसरे दिवशी श्री साईबाबांचे प्रसादाची पुडी घेऊन गेलो आणि प्रथम त्याचे मुखात प्रसाद घातला. श्रीबाबांनी मला दृष्टांत देऊन सांगितलेले शब्द त्यांनी माझे कडून खरे करुन घेतले. नंतरच मग आम्ही सर्वांनी आनंदाने बाबांचा प्रसाद ग्रहण केला या ठिकाणीही श्रीबाबांनी आवडता अंक १६ हाच वापरला तो कसा तर ७+९=१६ मुलगा आहे याचे पत्र ७ व्या दिवशी आले व प्रत्यक्ष मुलगा ९ व्या दिवशी परत आला म्हणून मी म्हणतो की श्रीसाईबाबांनी याही ठिकाणी आपला आवडता १६ आकडा पुरा करुन दाखवला. आता ही माझ्या साताराचे सोमवार पेठेतील श्री साईबाबा मंदीरातून लोकानांही ७ किंवा ९ गुरुवारी उदी नेण्यासाठी मला लोकांना बोलावण्यास आदेश दिला आहे. माझे घरी श्री बाबांचे ठाण्यावर ७ किंवा ९ गुरुवारी येऊन आशिर्वाद घेतला व उदी घेऊन गेला तर त्यांचे हमखास संकट निवारण होते. असा फार मोठा अनुभव आला आहे, व येत आहे. आतापर्यंत अंदाजे ५ ते ६ हजार लोक ७ किंवा ९ गुरुवारी येऊन उदी व आशिर्वाद घेऊन संकट मुक्त झाले आहेत. यापेक्षा आणखी श्रीबाबांचे अस्तित्वाची व त्यांच्या आवडत्या १६ आकड्यांची प्रचिती असली पाहिजे. मला तर श्रीसाईबाबांनी १६ व्या आकड्याचे वरदानच दिले आहे असा माझा आत्मविश्वास आहे.

गाठीभेटी — ७

# श्रीसाईभक्त प्रा. डॉ. सौ. चारुशिला गुजे

※ सदानंद चेंदवणकर



मुंबापुरीच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या वेगानं वावरणाऱ्या डॉ. सौ. चारुशिला गुजे यांना कोण ओळखत नाही ! भल्या पहाटे पासून तो मध्यरात्रीपर्यंत सौ. चारुशिलाबाईंची विविध क्षेत्रातली आपली कामगिरी चालूच असते. बाईंना कामाचा कंटाळा म्हणून कधी नाही लेखन-भाषणांचा तर नाहीच नाही. घरातली साफसफाई, आपल्या पतीराजांचा स्वयंपाक, भोजन, देवपुजा व त्यातच आपले स्वतःचे सारे उरकून बाई सकाळी सात वाजता चर्चगेट जवळच्या जयहिंद कॉलिजात अगदी न चुकता हजर होतात. चारुशिलाबाई तिथं मराठी विभागाच्या मुख्य प्राध्यापिका आहेत. त्यांचे या वयातील कामकाज व प्रचार कार्य व साहित्यसेवा बघून कुणालाही मोठे नवल वाटेल.

सतत कार्यरत रहाणं अशी लहानपणापासून बाईंना आपल्या घरातून जणू शिकवणच मिळालेली आहे. बाईंचं बालपण कुलाबा जिल्ह्यातील चौक गावात गेलं हे गाव शिवाजी महाराजांचा उजवा हात म्हणून प्रसिद्ध असलेल्या नेताजी पालकरांची जन्मभूमी होय. बाईंचा जन्मपण तिथलंच. पूर्वाश्रमीच्या त्या कु. शकुंतला रामचंद्र प्रधान, त्यांचे वडिल सैन्यात नोकरीस होते. १९१४ चे पहिले महायुद्ध त्यांनी पाहिले होते. चारुशिला बाईंच्या मातोश्रीचे नाव यशोदा. त्या परमेश्वर भक्त होत्या व त्यांचीच परंपरा या कन्या चारुशिलाबाई चालवित आहेत. चारुशिलाबाईंचे सारे शिक्षण पुणे–मुम्बई येथे झाले आहे. पुण्याला असताना त्या एस. एन. डी. टी. च्या विद्यार्थीनी. मालतीबाई बेडेकर व कुमुदिनी रांगणेकर या

नामांकीत शिक्षिकांचे मार्गदर्शन त्यांना शैक्षणिक जीवनात लाभले आहे व त्यांच्या संस्कृतीचा ठसा बाईंच्या जीवनावर उमटलेला आहे.

१९३६ साली मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर चारुशिलाबाईंनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजात उच्च शिक्षणासाठी नाव दाखल केलं खरं पण याच सुमारास त्यांच्या वडिलांचं अचानक देहावसान झालं त्यामुळे विश्वविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी बाईंना अपरंपार कष्ट करावे लागले. प्रसंगी दुसऱ्या घरची धुणी–भांडी–स्वयंपाक करून त्यांनी मोठ्या नेटाने १९४०त मराठी घेऊन बी. ए. व १९४४त एम. ए.ची पदवी मिळविली. एम. ए.च्या अभ्यासाच्यावेळी तर त्यांनी अक्षरशः भाजी विकून तर कित्येकदा गरजू विद्यार्थ्यांना नोटस् टाईप करून देऊन त्यातून मिळणाऱ्या प्राप्तीतून आपला खर्च भागवला आहे. शारदा सदन शाळेत त्या अवघ्या दहा रु. मासिक पगारावर नोकरीस होत्या व दोन रुपयात शिकवण्या करीत असत. त्यांच्या विकट परिस्थितीत त्यांना जर कुणी सर्वतोपरीने सहाय्य केलं असेल तर सुप्रसिद्ध क्रीडा समीक्षक बॉबी तल्यारखान यांच्या मातोश्रीने. त्यांचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. बाई पहिल्यांदा विलायतेला ज्या जाऊन आल्या त्या त्यांनी प्रयत्न करून मिळवून दिलेल्या शिष्यवृत्तीमुळेच.

१९४७ साली बाईंचा विवाह श्री. बाळकृष्ण गुप्ते यांचेशी झाला. श्री. गुप्ते हे सध्या सेंट्रल बँकेच्या एका शाखेचे एजंट आहेत. विवाहानंतर मात्र सौ. गुप्तेंच्या जीवनात झटकन् बदल झाला. त्यांनी डॉ. करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पी. एचडी. साठी "हास्यकारण व मराठी सुखांतिका" हा प्रबंध लिहिला व डॉक्टरेटची पदवी मिळविली. या ग्रंथास इंदूर मराठी साहित्य सभेने एक हजार रुपयांचा पुरस्कार दिलेला आहे.

सौ. गुप्ते यांनी डॉक्टरेट मिळविताच भवन्स कॉलेजात मराठीचे प्रोफेसर म्हणून नोकरी पकडली. १९४९ ते ५१ हा काळ त्या तिथे होत्या. त्यानंतर त्यांनी जयहिंद कॉलेजात मराठीची प्राध्यापिका म्हणून नोकरी पत्करली सध्या त्या त्याच कॉलेजात मराठी विभागाच्या प्रमुख प्राध्यापिका म्हणून मिरवीत आहेत. बाईंची साहित्याची सेवा भरपूर आहे. तीन कथासंग्रह, तीन नाटके, प्रवासवर्णनात्मक पुस्तक बर्फाच्या दुनियेत, सहा समीक्षणात्मक पुस्तके, आणि झाजिमा, झुमकीं, गमत्या पुंट्ट, तीन गांधी, वीरबाजी प्रभू, क्रांतीवीर फडके, काश्मीरी करंडी एक ना दोन चांगली चौदा पुस्तके मुलासाठी त्यांनी लिहिली आहेत. 'आनंदवन्' या मुंबापुरीतील बालसंघटनेच्या त्या संस्थापिका आहेत व आनंदवन' या त्याच संस्थेच्या मुखपत्राच्या प्रधान संपादिका आहेत. मुलांच्या करिता खूप खूप लिहावं असं त्यांना वाटतं.

सौ. चारुशिला बाई परमेश्वर भक्त आहेत. एकाकाळी त्या श्रीसाईबाबांच्या भक्त नव्हत्या पण आज त्या निस्सीम साई उपासक आहेत. त्याच नव्हे तर त्यांचे

पती आणि चिरंजीव हे पण साई भक्त आहेत. त्यांचे पुत्र चिरंजीव प्रणय सध्या अमेरिकेस ' न्यू यॉर्क टाईम्स ' या वृत्तपत्रात आहेत. आपल्या आईपेक्षा ते अधिक साईभक्त आहेत. असेच म्हणावे लागते. अमेरिकेत सुद्धा त्यांची साईभक्ती चालू आहे. त्यांना खायला साधं चॉकलेट जरी कुणी दिलं तरी ते प्रथम साईबाबांच्या पुढ्यात ठेवतात व मगच आपण खातात. इतर सर्व पदार्थांचे पण अगदी तसंच. बाबांनी उष्टावल्याशिवाय आपण खायचं नाही असा मनाशी त्यांनी जणू निश्चयच केला आहे.

सौ. गुप्ते १९५७ साली प्रथम शिरडीला गेल्या. यापूर्वी त्यांना इच्छा झाली नाही की काय कुणास ठाऊक पण या बाबतीत त्या म्हणतात, " बाबांची जर खरोखरीच इच्छा असेल तर शिर्डीला अगदी निर्वेधपणे जाता येते नाहीतर मग जाण्या येण्याच्या मार्गात म्हणा किंवा एकंदर ठरविलेल्यात म्हणा काहीना काही अडीअडचणी उपस्थित होतातच. आता पर्यंत माझं तसंच झालं. पण १९५७ साली आम्हीं शिर्डीला अगदी धावती भेट दिली पण तेथली बाजरीची भाकरी व मेथीची भाजी हा प्रसाद काही आम्हाला मिळाला नाही. आम्हाला त्याबद्दल चुटपुट लागून राहिली. इतक्या लांबवर जाऊन प्रसादाशिवाय आपण निघालो याबद्दल निदान मला तरी खूप वाईट वाटले व आम्ही घरी परतलो खरं, पण काही वेळातच आमचं दार ठोठावलं गेलं व आमच्या ओळखीचे एक सद्‌गृहस्थ आले. ते शेजारीच मुंबई विद्यापीठाचे माजी रजिस्ट्रार श्री. एस. आर. डोंगरकेरी यांचेकडे गेले होते व तेथून ते आमच्याकडे आले व म्हणाले आम्ही शिर्डीस गेलो होतो व केवळ तेथला प्रसाद द्यावा म्हणून आलो आणि पहाते तो काय बाजरीची भाकरी व मेथीची भाजीच हातात मिळाली. बाबांचा प्रसाद तिथे मिळाला नाही पण तो असा दाराशी आला याबद्दल मला जे आश्चर्य वाटतंय ते अजूनपर्यंत बाबांच्या-वरील माझी श्रद्धा तेव्हापासून आणखीन वाढली आणि आता तर मी पूर्ण बाबा भक्तच आहे. दररोज रात्री दहा वाजता बाबांची घरी आरती केल्यावाचून आम्ही मुळी झोपतच नाही.

एकदा बाईंना वाटेत बाबांचा पॉप्युलर पोजचा पुतळा दिसला. त्याच्या डोळ्या-तील विलक्षण तेजाने त्या इतक्या आकर्षित झाल्या कीं त्यांनी तो पुतळा लगेच विकत घेतला घरी आणून त्यांनी त्याची एका काचेच्या पेटीत योजना केली. त्याला त्यांनी कपडे शिवले. बाजूला लोड केले. आज हा पुतळा त्यांच्या दिवाणखान्यात आहे व तो कुणाचेही लक्ष वेधून घेतो. बाई नेहमी बाहेर पडताना त्या पुतळ्याला वंदन केल्याशिवाय बाहेर पडत नाहीत. या पुतळ्याच्या बाबतींतील एक चमत्कारीक घटना तर ऐका–एकदा चारुशिला बाईंचं एका मोठ्या समारंभात भाषण होतं. श्री. वि. स. खांडेकर तिथे अध्यक्ष होते. डॉ. आळतेकरांसारखे विद्वान तिथे येणार होते. पण वेळेच्या अभावी काही बाईंची भाषणाची तयारी झाली नव्हती. त्या अगदी

अस्वस्थ झाल्या. काय करावं हेच त्यांना समजेना पण शब्द दिला आहे म्हणून जायला तर हवंच म्हणून त्या तयार झाल्या. बाबांच्या पुतळ्याला त्यांनी वंदन केलं आणि इतक्यात एक टपोरं गुलाबाचं फुल टपकन् त्यांच्या पाठीवर पडलं. ते कुठून पडलं किंवा कुणी टाकलं हे काही समजायलाच मार्ग नाही पण पडलं एवढं अगदी शंभर टक्के खरं. ते फूल घेऊन बाई भाषणाला गेल्या आणि तिथं त्यांचं भाषण सर्वोत्कृष्ट झालं. त्यांच्या भाषणाची सर्वांनी मुक्तकंठानं प्रशंसा केली. "तयारी मुळीच नसताना हे सर्वोत्कृष्ट भाषण कसं काय झालं?" असं बाईंना विचारताच त्या म्हणतात," हे भाषण मी बोलत नव्हतेच कुणी तरी एक अदृश्य शक्ति माझ्या तोंडून भरभर वाक्ये बोलत होती. मी फक्त तिथे नावाला होते असंच मला वाटतं.'

एकदा बाईंचा मुलगा कु. प्रणय खूप आजारी झाला. त्याचा ताप म्हणून काही उतरेना. बाई रात्रंदिवस त्याची सेवा करीत होत्या. एकारात्रीतर त्या प्रणयच्या उशाशी बसून कोलन वॉटरची पट्टी त्याच्या कपाळावर ठेवून होत्या. मध्यरात्र उलटून गेली होती आणि इतक्यात त्यांचा डोळा लागला पण तो काही काळच. कसली तरी चाहूल त्यांना लागली. त्या झटकन् जाग्या झाला आणि पहातात तो काय! प्रणयच्या उशाशी एक फकीर बसलेला त्यांनी चक्क पाहिला. बाईंनी डोळे चोळून पुन्हा एकदार भीतभीत पाहिले तर तो फकीर तेवढ्यात अंतर्धान पावला. हा फकीर म्हणजे खुद्द श्रीसाईबाबाच होते अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. ज्या क्षणाला त्यांना हे दृश्य दिसले त्याच क्षणाला त्यांनी प्रणयच्या अंगाला हात लावून पाहिला तर त्याचा ताप उतरु लागला होता व काही वेळाने तो साफ काढला. अशा एकना दोन कितीतरी आठवणी बाईंजवळ आहेत. सौ. चारुशिलाबाई परम श्रीसाईभक्त आहेत त्यांनी काही महिन्यापूर्वी एक छोटीशी श्री साईगीतावली म्हणून पद्यरचना केली होती व ती छापून साईभक्तांना विनामूल्य वाटली होती.

# महाशिवरात्र

सदानंद चेंदवणकर

प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्दशीस शिवरात्री येते, पण माघ महिन्यातील शिवरात्रीस महाशिवरात्री असे म्हणतात. या दिवशी श्रीशंकराच्या पूजेचे महात्म्य विशेष आहे. या दिवशी श्रीशंकरोपासक उपवास करतात. शंकराची आराधना करतात आणि शिवलिंगावर रुद्राचा अभिषेक करतात व बेलाची पाने वहातात.

महाशिवरात्रीची कथा मोठी मजेदार आहे. एकदा माघ वद्य चतुर्दशीच्या दिवशी एक व्याध म्हणजे फासेपारधी शिकारीसाठी रानात जाण्यास निघाला. काही वेळाने तो एका तळयाचे काठी आला. त्याच्याकाठी एक बेलाचे झाड होते. शिकार करण्यासाठी तो त्या झाडावर दबा धरून बसला. पण पानाचे झुबके आड येऊ लागल्यामुळे त्याला शिकार नीट हेरता येईना. तेव्हा आपल्या डोळ्यासमोर येणारी पाने तो तोडून खाली टाकू लागला. मोठ्या योगायोगाची गोष्ट त्या झाडाच्या खाली श्रीशंकराची पिंडी होती. तिच्यावर बेलाचीच पाने अचूक पडू लागली.

इतक्यात त्याला समोरून काही हरणे पाणी पिण्यासाठी तळयाकडे येत असताना दिसली. त्याबरोबर त्याने आपला तिरकमठा सज्ज केला आणि त्याने त्या कळपातील एका हरिणीवर नेम धरला.

त्या पारध्याच्या हालचालीची चाहूल हरिणीला लागली. तेव्हा ती त्याला ओरडून म्हणाली, " अरे व्याधा, जरा थांब इतक्यातच तुझा तीर तू माझ्यावर सोडू नकोस. घरी माझी बछडी माझी वाट पहात आहेत, त्यांना मला एकदा भेटून येऊ दे. त्यानंतर तू मला अगदी खुशाल मार."

हरिणीची ती विनंती पारध्याने मान्य केली आणि ती परत येण्याची वाट पहात तो शिकारी त्या झाडावर वाट पहात बसला. रात्रभर काही एक खायला मिळाले नसल्यामुळे त्या व्याधाला आपोआपच शिवरात्रीचा उपवास घडला. त्याने शिवाच्या पिंडीवर बेलाच्या पानांचा अभिषेक केला होताच ! तोंडाने शिवनामाचा गजर झाला होता आणि याचा परिणाम म्हणूनच की काय त्या व्याधाचे मन हळूवार झाले होते. चित्त दयामय झाले होते व सुविचार त्याला सुचू लागले होते.

व्याधाला वचन दिल्याप्रमाणे सूर्योदयापूर्वी ती हरिणी आपल्या सबंध कळपासह तिथे आली आणि आता खुशाल आपला प्राण घे असे त्याला म्हणाली. व्याध

थक्क झाला ! हरिणीच्या प्रामाणिकपणाचे त्याला मोठे कौतुक वाटले त्याचे मन आधीच मृदू बनले होते ते आता अगदी पार विरघळून गेले अर्थात त्याने त्या हरिणीला मारण्याचा विचार सोडून दिला. त्यामुळे श्रीशंकर त्याच्यावर प्रसन्न झाले, आणि त्यांनी व्याध व हरिणी यांना विमानातून स्वर्गात नेले. तिथे त्यांना कायमचे सुख प्राप्त झाले. यावरून जे लोक महाशिवरात्रीचे व्रत करतील त्यांस अक्षय्य सुख मिळेल. रात्रीच्या वेळी आकाशात दिसणारे मृग नक्षत्र म्हणजेच ती हरिणी ! आणि त्या मृग नक्षत्राशेजारीच व्याधाची चांदणी चमकत असते. तिला व्याधाचा तारा असे म्हणतात. तोच या महाशिवरात्री कथेतला व्याध उर्फ पारधी होय.

आमच्या भारतीय दैवतामधे ब्रह्मा ( सृष्टिविधाता ) विष्णु ( मनुष्य जातीचा संरक्षक आणि पालन कर्ता दयाळू व कृपाळू ) आणि शिव ( अन्याय्य आक्रमणाचा प्रतिकार करुन आक्रमकाचा धुव्वा उडविणारा. सर्व शक्तिमान व अत्यंत उग्र ) अशा तीन देवाना फार मोठे मानण्यात येते; आणि त्यांची एकत्र किंवा वेगवेगळी पूजा करण्यात येते.

शिवाच्या मनःपूर्वक उपासनेला वाहिलेला शिवरात्री हा सण शिवभक्त अत्यंत महत्वाचा समजतात. आपल्या हिंदुधर्माचा काव्यमय व आध्यात्मिक दृष्टिकोन शिवामधे साकार झालेला आहे. शिवरात्री या दिवसाचे पावित्र्य इतके महान आहे की आपल्या देशातील संस्कृतीशी परिचित नसलेल्याना ते सहजासहजी ध्यानी आणून देता येणार नाही. त्याने आपल्या संस्कृतीत अत्यंत मोलाची भर टाकलेली आहे. शिवाचा इतिहास हा त्याच्या पराक्रमासंबंधीच्या व आचार शक्तिसंबंधीच्या अनेक विलक्षण दंतकथांनी भरलेला आहे, राक्षसांशी तुमुल युद्ध करुन त्यांना त्याने कसे शरण आणले. त्याने भक्त वात्सल्य बुद्धीने दिलेल्या वरांचा दुरुपयोग करुन त्याचेच भक्त त्याचाच नाश करावयास कसे निघाले इत्यादी अनेक गमतीदार कथा त्यात सापडतील.

ऋग्वेदातील रुद्राने वेदोत्तर कालात धारण केलेले रूप म्हणजेच शिव होय. त्याचेच कित्येक गुण शिवाच्या अंगी असलेले आढळतात. नीलकंठाच्या या उग्र शिवाने भस्म लावलेले असते आणि त्याने वाघाचे कातडे पांघरलेले असते. त्यांच्या केसाच्या जटा आकर्ण वळलेल्या असतात. त्याच्या तिसऱ्या डोळ्यातून अंगार बाहेर पडत असतो भूषणा ऐवजी त्याच्या कानात सर्प आढळतात आणि गळ्यात व खांद्यावरही सर्प आढळतात. त्याचे मुख्य अस्त्र म्हणजे त्रिशूळ आणि त्याचे वाहन म्हणजे शक्ति व जनन क्षमता यांचे प्रतिक असलेले नंदी होय.

श्री शंकराला ईश्वर, परमेश्वर, महादेव, शंभो महाबळेश्वर, त्रिनेत्र, पर्वतेश्वर, इ. अनेक नावांनी संबोधतात. भारतात पुढील बारा ठिकाणी त्यांची प्रसिध्द जागृत

मंदिरे आहेत. त्यांना शंकराची बारा ज्योतिर्लिंगे असे म्हणतात. १) काठेवाडात श्री सोरटी सोमनाथ २) दक्षिणेस श्री शैलमल्लिकार्जुन, ३) उज्जयिनीत श्री महाकालेश्वर, ४) नर्मदेच्या तीरावर श्री ओंकारनाथ, उर्फ आमलेश्वर, ५) मराठवाड्यातील परळी वैजनाथ, ६) पुण्याजवळ भीमा नदीचे उगमापाशी, श्री भीमाशंकर ७) दक्षिण भारतात श्री रामेश्वर, ८) मराठवाड्यात श्री औंढ्यानागनाथ, ९) वाराणशीस श्री काशी विश्वेश्वर, १०) श्री केदारेश्वर, ११) नाशिक जवळ श्री त्रिंबकेश्वर, १४) दौलताबादजवळ श्री घृष्णेश्वर.

महाशिवरात्रीच्या दिवशी या ठिकाणीच नव्हे तर जिथे जिथे म्हणून शंकराची मंदिरे आहेत तिथे तिथे महोत्सव होतो आणि श्रीशंकराचे पूजन अर्चन मोठ्या मनोभावाने तिथे केले जाते. आपले श्रीसाईबाबा श्रीशंकर भक्त होते, व त्यांनी आपल्या स्वहस्ते शिरडींच्या श्रीगुरुपादुकास्थानी एक शंकराची पिंडी पण स्थापन केली आहे या पिंडीची रोजच्या रोज पूजा केली जाते.

**चला, या महाशिवरात्रीच्या दिवशी आपणही भगवान श्रीशंकराची एकमुखाने प्रार्थना करू या.**

—Δ—

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ | साई निकेतन,<br>८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०००१४ |
| २. प्रकाशनाचा कालावधी | मासिक |
| ३. मुद्रकाचे नाव | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.<br>४२ जी. डी. आंबेकर पथ वडाळा,<br>मुंबई ४००० ३१ |
| ४. प्रकाशकाचे नाव | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | साई निकेतन<br>८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०००१४ |
| ५. संपादकाचे नाव | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता | साई निकेतन,<br>८०४ बी. डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०००१४ |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भाग-धारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री. साईबाबा संस्थान, शिरडी<br>( धार्मिक व चॅरिटेबल संस्था ) |

मी, श्री. काशिनाथ सीताराम पाठक यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**का. सी. पाठक**
( प्रकाशकाची सही )
रिसीव्हर
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

— ० ० —

"'अ'भंग" पत्रकार—

# श्रीसंत तुकाराम महाराज

ले. — सुभाष चंदवणकर

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

हुताशनी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी, फाल्गुन वद्य द्वितीयेस महाराष्ट्रात ही समतेची व मानवधर्माची उदात्त शिकवण देणाऱ्या श्रेष्ठ संतकवी तुकारामांचा उत्सव अतीव उत्साहाने साजरा केला जातो. महाराष्ट्राच्या साधुसंतांमध्ये तुकोबा महाराज यांचे स्थान आगळेच आहे. त्यांचे प्रखर वैराग्य, निर्मळ भक्ती, शुद्ध आणि सरळ अंतःकरण या त्यांच्या श्रेष्ठगुणामुळेच त्यांच्या तोडीचे भक्त नाहीत असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही.

महाराष्ट्राची संत परंपरा हे भाग्यशाली महाराष्ट्राचे फार मोठे वैभव आहे. महाराष्ट्राला सत्तेचा महामंत्र देणारी शक्ति म्हणजे संत परंपरा. ह्या संत मालिकेने महाराष्ट्रीय जनतेस भागवत धर्माची शिकवण दिली. त्याचा पाया ज्ञानदेवांनी रचला व तुकोबारायाने त्यावर कळसाचा साज चढविला; म्हणजे ज्ञानदेव हे प्रथम व तुकाराम हे अंतिम संतकवी होत. नामदेव, चोखामेळा, सांवतामाळी, गोरा कुंभार एकनाथ, नरहरी सोनार इ. संतांनी भक्तिमार्ग वाढीस लावला. महाराष्ट्रीय जनता आज हजारो वर्षे या संतांच्या पालख्या खांद्यावर घेऊन मुखकमलाने 'ज्ञानबा–तुकाराम'चा गजर, नामोच्चार करीत पंढरीस जाते.

श्रीसंत तुकारामांना वैकुंठात रोहण होऊन ३०० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला. संत तुकारामांच्या वडिलांचे नाव बाल्होबा. त्यांचा जन्म होता वैश्य वाणी समाजात. धंदा रोजगार म्हणून ते व्यापार उद्योग करीत. प्रामाणिकपणाने व्यापार करून त्यांनी स्वकष्टे नाव व बरीच संपत्ती मिळविली होती. ते विठोबाचे परम भक्त एकसारखे पंढरपुरास जाणे येणे योग जमत नसे, म्हणूनच त्यांनी घराशेजारी एक छोटे टुमदार देऊळ बांधले होते. त्यांचे आडनाव अंबिले. देवभक्तीने पावन झालेल्या या घराण्यात तुकारामांचा जन्म शके १५३० माघ व. पंचमी, इ. स. १६०८ मध्ये इंद्रायणीच्या तीरावरील पुण्याजवळच्या देहू क्षेत्री झाला. वयाच्या बाराव्या वर्षी तुकोबाचे लग्न झाले. रखुमाबाई ही त्यांची पहिली बायको. तुकाराम

१७ वर्षांचे असताना देशात दुष्काळ पडला. परिस्थिती बिकट झाली. कुटुंब विस्तार बराच असल्याने त्यांस बरेच कर्ज झाले. त्याच वेळी दुर्दैवाने त्यांची पत्नी वारली व त्यानंतर आई, वडिल, मुलगा अशी माणसे मरण पावली. परत त्यांनी दुसरा विवाह केला. जिजाई उर्फ आवळी ही मोठी तोंडाळ, तापट व जहांबाज स्त्री होती. तिला सहा अपत्ये झाली.

तुकारामांचा स्वभाव मूळचा विरक्त. तशात एका मागून एक संकटे आल्यामुळे त्यांचे मन विटले. जिजाईने तर त्यांना हैराण केले. त्यामुळे वैराग्याकडे त्यांचा कल झुकू लागून मनाला प्राणप्रिय पंढरीनाथाची ओढ लागली. संसारात संकट परंपरा निर्माण झाल्यावर परमार्थ प्रवण तुकाराम महाराज संपूर्ण परमेश्वराकडे वळले. एकनाथ इ. च्या ग्रंथाचे वाचन करून मुखोद्गत पाठांतरही केले. ते एकांतात ईश्वर चिंतन करावयास डोंगरावर जात. कीर्तनकारांच्या पाठीमागे ध्रुपद धरून तुकोबांनी "काही पाठ केली संतांची आरे।" पाठांतर केल्यावर त्यांचे चित्त निर्मळ झाले. काही दिवसात गुरूकृपा होऊन, प्रसन्न झाल्यामुळे बोवाना कवित्वाची स्फूर्ती झाल्यामुळे त्यांच्या मुखोगमातून पाझरणाऱ्या काव्यगंगेत महाराष्ट्रीय भाविक जनता सुखावली. मुखावाटे सहजासहजी बाहेर अवतरलेले हे रसाळ अभंग शिष्य उतरवून घेत. महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरातून तुकोबांच्या रसाळ अभंगवाणीने प्रवेश करून बहुजन समाजाची मने, अंतःकरणे भक्तिभावाने तल्लीन करून सोडली व त्यांना परमात्मा स्वरुपाचे दर्शन, मोक्षप्राप्तीचे भजन व विठ्ठलाचे नाम-गायन करण्याचे सोपे साधन हस्तगत करून देऊन आपल्या प्रासादिक अभंगाच्या द्वारे व्यवहाराची शिकवण, समतेचा संदेश, व भक्तीचा मार्ग सोप्या भाषेत दिला. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यापासून तो सभा जिंकणाऱ्या विद्वानापर्यंत, लोकजनांवर सत्ता करणाऱ्या अधिकारापासून तो आत्मानंदात निमग्न राहणाऱ्या योगीजनापर्यंत आज सर्वांना तुकाराम महाराज वंद्य आहेत.

तुकाराम महाराज अभंग रचना करतात व तत्वज्ञान शिकवितात; एका वैश्य वाण्याने सर्वांना तत्वज्ञान शिकवावे हे काही वरचढ ब्राह्मणांना सहन न होऊन त्यांनी त्यांचे सर्व अभंग पोथी इंद्रायणीत बुडविले ते तसेच बारा दिवस विठ्ठल नामस्मरण करीत अन्न घासाशिवाय वा जलदेवाशिवाय तीरावर बसून राहिले आश्चर्याची गोष्ट ही की तेराव्या दिवशी त्यांची ती पोथी जलस्पर्शा संबंधित असून सुद्धा कोरडीमुकी आपोआप वरती आली. शेवटी ती पोथी घेऊन परमेश्वराचे स्मरण करीत ते घरी आले. यामुळे सर्वांना त्यांची योग्यता पटून शत्रूही त्यांचे शिष्य झाले तुकोबांना सद्गुरुनी स्वप्नात दर्शन दिले. त्यांची सेवामंजूर केली. त्यांच्या भक्ति पत्रावर आपला शिक्का नोंदवून दिला. तुकोबांना कवित्वाचीही प्रेरणा स्वप्नात मिळाली. चैतन्यपरंपरेतील श्री बाबाजी चैतन्य सद्गुरूने. माघ शु. १०,

गुरुवार शके १५६१, [ २३ जाने. १६४० ] रोजी तुकोबांना चैतन्याचे निशाण देऊन, 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला आणि जगभर ते मिरविण्याचा हक्क देऊनही टाकला.

तुकारामांनी खूप खूप अभंग लिहून मराठी साहित्य वाङ्मयात फारच मोलाची-भर टाकली आहे. परंतु त्यापैकी ४६०० अभंग उपलब्ध आहेत. त्यातील शब्दयोजना, स्वर व महान् उपदेश ही लक्षात घेतल्यास ३२५ वर्षांपूर्वीचा हा संतकवि मोठा तत्वज्ञानी व साहित्यिक होता असे दृष्टीस येते. या (अभंग) संग्रहास 'तुकारामाची गाथा' म्हणतात. त्यातील ह्या बहुमोल तत्वज्ञानांची इंग्रजीतही भाषांतरे झाली आहेत. संस्कृतातील अंतराळी तत्वज्ञान ज्ञानोबांनी मराठीत आणल्यावर आपल्या अभंगवाणीने भूमितलावर तुकोबांनी आणले. स्वतः परमेश्वर-प्राप्तीनंतर मात्र तुकाराम "उपकारापुरते उरले" होते. आपण स्वतः जेवून तृप्त झाल्यावर इतरांना संतर्पण करण्यासाठी त्यांचे जीवित होते. तत्कालीन समाजातील अनिष्ट चाली, ढोंगे, बुवाबाजी, नवससायास, यावर तिने प्रहार करून समाजसुधार-काचे काम त्यानी चोख बजावले केवळ स्वतःचाच मोक्ष; स्वार्थ साधणारे तुकाराम नव्हते. सर्वांना त्यांनी वैराग्याचा बोधही दिला नाही; तर प्रपंच हाच हरिरूप मानून निरंहकार वृत्तीने रहावे हा भागवत धर्मांचा श्रेष्ठ संदेश त्यांनी थेट सामान्य जनतेपर्यंत पोचविला.

# श्रीसाईभक्तासाठी नवे भक्तनिवास : नूतननामकरण "शांतिनिवास"

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीस भाविकांची श्रीबाबांच्या दर्शनास अखंड रीघ चालू असते. अखिल विश्वातून श्रीसाईभक्तांची गर्दी शिर्डीला बाराही महिने व तिसही दिवस होत असते. गुढीपाडवा, रामनवमी, गुरुपौर्णिमा, विजयादशमी या पर्वकालात तर बाबांचे समाधिमंदिर अहोरात्र खुले असते व दुरून दुरून येणाऱ्या भक्तमंडळींच्या निवासाची रात्रंदिवस व्यवस्था करता करता संस्थानचे व्यवस्थापक अक्षरशः थकून जातात. पण काहीही झाले तरी आमच्याकडे निवासाची सोय काही अपुरी पडत नाही हे विशेष होय. निवासस्थाने भरून झाल्यावर खास मंडप घालून भाविकांची सोय आम्ही आतापर्यंत करीत आलो आहोत. यातच नव्याने भर म्हणून की काय आता भाविकांसाठी नवीन एक भक्त निवास क्रमांक दोनचे येत्या गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर उद्‌घाटीत करण्याचे संस्थानने ठरविले आहे.

हे नूतन भक्तिनिवास तीन मजली आहे. या नव्या निवासस्थानाचे भूमिपूजन अहमदनगर जिल्हापरिषदेचे अध्यक्ष श्री. रामनाथ जी. वाघ, बी. ए. एल. एल. बी. यांचे शुभहस्ते १७ अक्टोबर १९७२ रोजी पार पडले होते तर कोनशिला समारंभ गणेशपुरीचे परमहंस परमव्राजिकाचार्य श्री. मुक्तानंदस्वामी यांच्या उपस्थितीत २४ मार्च १९७३ रोजी करण्यात आला होता. श्री. मुक्तानंदस्वामींच्याच आदेशानुसार या भक्तिनिवास क्रमांक २ चे नाव "शांतिनिवास" असे ठेवण्यात आले आहे.

हे नूतन भक्तिनिवास तीन मजली आहे. सव्वादोनशे फूट लांब व त्रेपन्न फूट रुंद एवढी जागा या निवासस्थानाने व्यापली आहे. पंचावन्न फूट ही इमारत उंच आहे.

या भव्य इमारतीच्या तळमजल्यास अकरा हजार चौरस फूटाचे एक विशाल प्रेक्षागृह असून एक हजार चौ. फूट जागा 'संचय कमरा' म्हणून वापरली जाणार आहे. दोन हजार चौरस फूट जागा स्वागत कक्ष म्हणून आरक्षित करण्यात आली असून तेवढीच जागा नव्या वाचनालयासाठी म्हणून उपयोगिली जाणार आहे. या नूतन वाचनालयात श्रीसाईबाबांच्या वरील सर्व भारतीय व पाश्चात्य भाषेतील ग्रंथ व पुस्तके ठेवण्यात येणार असून अध्यात्मिक विषयावरील विविध ग्रंथ पण येथे गरजू अभ्यासूंना लाभणार आहेत. तळमजल्याच्या भिंतीत आतून ठिकठिकाणी २२ कपाटे करण्यात आली असून प्रत्येक कपाटात आठ फळ्यांची योजना केलेली आहे.

या नूतन शांतिनिवासाचे तीन मजले ब्लॉक्सने व्यापलेले आहेत. प्रत्येक मजल्यावर तीस दोन खणी ब्लॉक्स असून ते सर्व आधुनिक सुखसोयींनी सुसज्जित असे आहेत. प्रत्येक ब्लॉक्सने २५० चौ फुट जागा व्यापलेली आहे. तीन मजले मिळून

एकूण ९० ब्लॉक्स आहेत. प्रत्येक ब्लॉकमध्ये रहाण्याची खोली व स्वयंपाकाची खोली व त्याशिवाय स्नानगृह अशी सोय असून हस्तप्रक्षालन पात्राची (वॉश बेसिन) पण तरतूद आहे. वीज, पंखा, पलंग, बिछाना. उशा, २ खुर्च्या एक मेज, बादली, तांब्या इ. वस्तू प्रत्येक ब्लॉकसला पुरविण्यात आलेल्या आहेत.

इमारतीवर साडेबारा हजार गॅलन्स युक्त पाण्याच्या प्रत्येकी दोन टाक्या असून त्यातील पाण्याचा उपयोग पिण्यासाठी व इतर वापरासाठी केला जाणार आहे. इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर बारा संडासांची व्यवस्था करण्या आलेली आहे.

या भव्य इमारतीस वीस लाख रुपये खर्च आला असून ती मजबूत आहे. या इमरतीचे संपूर्ण बांधकाम मुंबईच्या नवजीवन कनस्ट्रक्टन्स कंपनीतर्फे कल्पक स्थापत्य विशारद श्री. एस. एच. गोडबोले यांनी केले असून इमारतीतील विद्युत, प्रसारणाची योजना मुम्बईच्याच शहाडे आणि कंपनीनें केली आहे.

श्रीसाईभक्तांसाठी बांधण्यात आलेल्या या नूतन शांतिनिवासाचे उद्घाटन येत्या हिंदू नववर्षदिनी ( गुढीपाडवा ) शनिवार ता. १२ एप्रिल १९७५ रोजी होत आहे.


# श्रीसाईलीला

## चौपन्नाव्या वर्षाचा पहिला अंक एप्रिल १९७५

**या अंकात काय काय वाचाल :**

१ महाराष्ट्र राज्याचे नवे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांची साईभक्ती
२ श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने या लेखमालेत मुंबईतील कॉंग्रेस हाऊस समोरचे श्री. दळवींचे साईमंदिर लेखक–श्री. चंद्रकांत सामंत
३ शिर्डीच्या श्रीधुनीमाईचे महत्व–श्री. श्रीराम सातर्डेकर.
४ गुढीपाडवा-नववर्ष दिनाचा प्रथम दिन माहितीपूर्ण लेख.
५ श्रीरामनवमी निमित्य खास लेख
६ श्री. र. श्री. पुजारी लिखित श्रीसाईनाथ चरित्र
७ श्री. बाबाविषयक सामान्य ज्ञानाचे नवे रंजक सदर
८ श्री. द. शं. टिपणीस यांचे वैचारिक सदर
९ श्रीसाईभक्तांचे अनेक अनुभव शिवाय
१० मालेगावच्या कवयित्री सौ. सुशिलाबाई हजारे यांची शिर्डीतील रामनवमी उत्सवावरील वर्णनपर भावरम्य कविता चिपळूणकर गुरुजी, श्रीकृष्णगंधे, सौ. लीला पंडितराव, दत्तात्रेय मोरे, प्रकाश सहस्रबुद्धे, नरेंद्र कृष्ण, श्रीधर प्रभुणे यांच्या साईभक्तीवर कविता.

**पृष्ठे ४८** **किंमत ६० पैसे**

# शिरडी-वृत्त माहे जानेवारी १९७५

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. गुरुवार, रविवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

कीर्तन :– १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. गंगाधर नरहर बुवा व्यास. पुणे. ३) सौ. मंगला अच्युत बेलिंगा मुंबई २८

४) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाघचौरे, शिर्डी.

भजन :– १) श्री सत्य साईबाबा सेवा समिती उल्हास नगर

२) प. पू. कलावतीमाता भजनी मंडळ येवला.

गायन, वादन १) श्री. भोलानाथ समेळ मुंबई २) श्री. शिंदोरे विजय कुमार नासिक नृत्य वगैरे ३) श्री. बाळासाहेब मारदळकर पुणे ४) श्री वसंत मु. साळवे. अ. नगर ५) श्री. नामदेव भि अकाट मोरे चिंचोरे. ६.) श्री. रामकिसन म. अडलगे शेवगाव ७) श्री. बाळू व साळवे. शिंगवा नाईक. ८) श्री. हरिश्चंद्र भु. पाटोळे नेवासा. ९) स्वामी रामानंद बेळगाव १०) श्रीमती कु. रजनी व कामत. बडोदा. ११) श्रीमती माई शिरोडकर मुंबई ४. १२) श्रीराम व्ही. सातर्डेकर मुंबई १२

१३) श्री. जयवंत कुलकर्णी मुंबई.
१४) श्री. हेमंत ज. पंडित मुंबई.
१५) श्री. जर्नादन य. पंडित. मुंबई.
१६) श्री. उज्वल वढावकर, मुंबई.
१७) श्री. शरीफ अहमद मुंबई.
१८) श्री. देवासकर मुंबई.
१९) श्री. अशोक पटेल मुंबई.
२०) श्री. एम. वसंतकुमार मुंबई.
२१) श्री. बाळ साठे मुंबई.
२२) श्री. राजन साठे मुंबई.
२३) श्री. पद्माकर प्रधान मुंबई.
२४) श्री. माधव पा. पवार मुंबई.
२५) श्री. मोरेश्वर ना. सोलापूरकर पुणे.
२६) श्री. चंद्रकांत देवळणकर पुणे.
२७) श्री. गुणानाथ खानोलकर, पुणे.
२८) श्री. बाळ चापरे मुंबई.
२९) श्री. शिवराम घोगळे मुंबई.
३०) श्री. बी. एम. धुमडे. मुंबई.
३१) श्री. एम. आर. दुर्गुळे मुंबई
३२) श्री. एस. बी. शेरे चेंबूर.
३३) श्री. ए. एस. केसकर मुंबई १३.
३४) श्री. एस. एस. पवार मुंबई २२
३५) कु. जयमाला काळे, पुणे.
३६) श्री. एकनाथराव चव्हाण पुणे.
३७) सौ. कुसुम अणेलु पुणे.
३८) श्री. विठ्ठलराव आढाव. पुणे.
३९) श्री. सदाशिव सुतार, पुणे.
४०) श्री. किसन खडागळे. पुणे.

**वेद पठण :—** १ ) वे. शा. स. लिंबाबुवा रा. पारेकर बीड.
२ ) श्री. राजाराम ना. जोशी.

**प्रवचन :–** १ ) डॉ. के. भ. गव्हाणकर २ ) श्री. जगन्नाथ बि. गायचोरे शिर्डी. ३ ) ह. भ. प. रघुनाथबुवा. पंढरपूर.

**प्रजासत्ताकदिन:**–दि. २६ जानेवारी १९७५ रोजी सकाळी ७.३० वा. मंदिराचे गच्चीवर, माननीय रिसीव्हर श्री. का. सी. पाठक यांचे शुभहस्ते ध्वज वंदन कार्यक्रमास संस्थान नोकर, सेवेकरी, गावातील प्रतिष्ठित नागरिक बाहेर गावाहून आलेले साईभक्त साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी विद्यार्थीनी बॅण्डपथक, होमगार्ड, पोलीस उपस्थीत होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. माननियांच्या भेटी:

१) श्री. एस. व्ही. देव. आय. ए. एस. सेवानिवृत्त सचिव महाराष्ट्र राज्य,
२) श्री. एम. डी. कांबळी. डिस्ट्रीक जज्ज ठाणे.
३) श्री. एन. डी. काळे. सेक्रेटरी महाराष्ट्र राज्य इ. व द. खाते. मुंबई
४) श्री. जामवाल. आय ए. एस. चिफ एक्झीक्यूटीव्ह ऑफिसर. जि. परिषद धुळे.
५) न्यायमूर्ती श्री. एन. डी. कामत. हायकोर्ट जज्ज मुंबई.
६) श्री. डॉ. नागेंद्र सिंहजी न्यायमूर्ति इंटर नॅशनल कोर्ट जिन्हेवा.
७) श्री. चौगुले. कमिशनर औरंगाबाद.

**हवापाणी:**–शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे. पहाटे गारवा असतो.

## शिर्डीसंस्थानचे प्रामाणिक रोखपाल :

# कै. गोविंद भिकाजी कासार

कै. श्री गोविंद भिकाजी कासार, संस्थानचे रोखपाल यांचे अहमदनगर येथे रुग्णालयात दि. २६-१२-१९७४ रोजी दीर्घ आजारानंतर दुःखद निधन झाले.



कै. कासार, संस्थानचे रोखपाल होते. त्यांच्या निधनाने संस्थान अधिकारी व त्यांचे सहकर्मचारी ह्यांना खूप दुःख झाले.

कै. गो. भि. कासार यांचा जन्म दि. १-७-१९३० रोजी शिर्डी पासून ३ मैल असलेल्या राहाता या गावी शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे शालेय शिक्षण शालांत परीक्षेपर्यंत झाले होते. सन १९५८ मध्ये ते लिपीक म्हणून श्रीसाईबाबा संस्थानचे सेवेत आले. सन १९५८ ते जुन ६९ पर्यंत त्यांनी संस्थानच्या विविध शाखेत प्रामाणिकपणे आणि तन्मयतेने काम केल्यानंतर त्यांच्या जेष्टतेप्रमाणे आणि जून ६९ मध्ये त्यांना संस्थानचे रोखपाल म्हणून बढती मिळाली. त्यावेळेपासून त्यांनी रोखपालाचे काम अतिशय तळमळीने व प्रामाणिकपणे केले. त्यांच्या प्रामाणिकपणाचे दोन अनुभव :-

एकदा महिना अखेरीस दक्षिणा पेट्या उघडल्यानंतर त्यातील नाणी (मोड) सर्व उपस्थितांनी मोजली. चिल्लर रकमेपैकी २० पैशाच्या नाण्यात एक सोन्याचे नाणे निघाले. ते त्यांनी प्रामाणिकपणे कोर्ट रिसीव्हर यांच्या ताब्यात दिले. तसाच अनुभव पुन्हा एकदा आला. या वेळी कै. कासार यांचे धाकटे चिरंजीव श्री. सतीश गो. कासार वय १४ वर्षे हे त्यांना कामास मदत करीत होते. त्यानीही २० पैशाच्या नाण्यात सापडलेले सोन्याचे नाणे (सॉव्हरीन) कोर्ट रिसीव्हर यांच्या ताब्यात आणून दिले.

कै. कासार यांच्या मागे पत्नी, ४ मुली व ३ मुले असा परिवार आहे.

असा हा मनमिळावु, प्रामाणिक सेवक आमच्यातून अचानक निघून गेल्याने संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांची त्यांना साश्रु नयनांनी श्रद्धांजली.

ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

# श्रीसाई पद

सुंदर ते ध्यान बसे मशिदीत । कठड्यावरी हात टेकोनिया ॥ १ ॥
डोई शुभ्र फडका धरी हाती सटका । चिलीम आणिका सदोदित ॥ २ ॥
तमाखु ओढुनी देई ज्ञानामृत । भक्तिभाव प्रेम सकळांका ॥ ३ ॥
पवित्र शिरडी दासा रोकडी । देईल बापुडी प्रेमरस ॥ ४ ॥

—रघुनाथ बाबूराव सांडभोर

# बोल बोल रे साईनाथा

बोल बोल रे साईनाथा
या भक्तासी बोल तू आता
नमीतो चरणी तुझ्या माथा
बोल बोल रे साईनाथा ॥ १ ॥

किती मी विनवू तुला आता
सांग मला तू साई भगवंता
करी कृपा भक्तावरी आता
बोल बोल रे साईनाथा ॥ २ ॥

दयावंत तू कृपावंत तू
या शिरडीची शोभा आहे तू
दगडामध्यें शोभतो नाथा
बोल बोल रे साईनाथा ॥ ३ ॥

दीन लीन तुझा भक्त नाथा
सांग कुठें मी जाऊं आता
ठेवीतो चरणीं उद्धव माथा
बोल बोल रे साईनाथा ॥ ४ ॥

# साई भजन कर रे

उद्धवा, साई भजन कर रे
भजना मध्ये रंगूनी जा रे
ध्यान सदा साईचे लावरे ॥ १ ॥

कर तु बाबा साईची भक्ती
देईल तुला तोच शक्ती
होईल प्रसन्न ही त्रैमूर्ती ॥ २ ॥

वेडे वाकुडे नांव मी घेतो
देवाजीचे गुण मी गातो
डोळ्यापुढे तू मज दिसतो ॥ ३ ॥

निर्गुण निराकार तूचि आहे
मूर्ती तुझी रे हृदयांत आहे
विनवी उध्दव दास तुला रे ॥ ४ ॥

साईदास–उद्धव भावसार

# दर्शन

श्रीसमर्था सद्गुरुसाई । दे दर्शन मज लवलाही ।
तुझ्या दर्शनाविण । जळाविण जैसा मीन ।
तळमळतो रात्रंदिन । कृपा सागरा साई ।
दे दर्शन मज लवलाही ॥ १ ॥
भक्त वत्सला दीनदयाळा । अनाथांच्या नाथा ।
नको अंतरे पाहू आता । विनविते चरणी ठेऊनी माथा ।
सद्गुरावा शिरडीश्वरा । करुणा निधान साई ।
दे दर्शन मज लवलाही ॥ २ ॥
देशील कधी दर्शन । निवतील मम नयन ।
तृषार्त मी मज देई जीवन । पावन होईल अवघे जीवन ।
बरसू दे दर्शन जीवन धारा । मेघ श्याम साई ।
दे दर्शन मज लवलाही ॥ ३ ॥
अनंत अपराधाच्या राशी । म्हणूनी कां मजभेट न देशी ।
तुझ्या दर्शनाचा माहिमा । ज्ञात नसे का तुज दयाळा ।
दर्शन होता तत्क्षणी । जळतील पापाच्या राशी ।
पतित पावना साई । दे दर्शन मज लवलाही ॥ ४ ॥

—सौ. सुशीलाबाई हजारे

# श्रीसाईशाचे अबोल प्रेम

अबोलतेच्या तव प्रेमाला शब्दाचिही ना सीमा ।
अश्रद्धतेच्या शक्तिमधुनी दाविसी तूं महिमा ॥
साईशा दाविसी तूं महिमा ॥ ध्रु ॥ १
नदी वाहते सहजपणाने उसंत ना तिजला ।
मग्न राहुनी कार्ये आपुल्या जात असे निजधामा ॥ २ ॥
स्वार्थपणाची कक्षा तोडुनी भानु येत उदयाला ।
सर्वस्वही ते अपुले देऊनि उंचवि निजधर्मा ॥ ३ ॥
वेली वरती फुले डोलती देत सुगंधाला ।
यागमयी हे जीवन तुजला भूषण पुरूषोत्तमा ॥ ४ ॥
निसर्गातले जीवन चाले भरूनि मुग्धतेला ।
सत्कर्मातील आनंदाची हीच खरी प्रतिमा ॥ ५ ॥

—शाम जुवळे

# देवा मजला आलास धावूनी

आजवरी जे मागितले मी
दिलेस साई मुक्त करांनी।
तीळभर घडली नाही सेवा
देवा मजला आलास धावूनी ॥ ध्रु० ॥

मी तर देवा नित्य भिकारी
होउ कसा मी तुझा पुजारी
तूंच देवा अन्तर्ज्ञानी
आर्त हांक तव पडता कानी
देवा मजला आलास धावूनी ॥ १ ॥

कसा येऊं मी तव सेवेला
काही न उरले तव पुजेला
तूंच देवा हे सांगूनी
हांक पडेल कां ही तव कानी
देवा मजला आलास धावूनी ॥ २ ॥

माय बाप मम बन्धु भगिनी
ही मम बाले अन् सहचरणी
तुझी बाले घे संभाळूनी
दीनाची ही हांक ऐकूनी
देवा मजला आलास धावूनी ॥ ३ ॥

शरिर अवघे तूंच घडविले
हृदय कमल हे तूच लाविले
माझे मी हे काही न मानी
देह माझा लागो तव चरणी
दासाचे हे घ्यावे मानूनी ॥ ४ ॥

आजवरी जे मागितले मी
दिलेरा साई मुक्त करांनी
तीळभर घडली नाही सेवा
देव मजला आलास धावूनी ॥ ५ ॥

—डी. बी. पोतनीस (पिंपरी)

# श्रद्धागीत

साई सारखे दैवत माझे असता माझ्या घरी
कशाला जाऊ मी काशी रामेश्वरी ॥ ध्रु ॥
हृदयीं माझ्या वास तयाचा
स्मरते त्या मी कायावाचा
साद घालता धावत येई—न विसंबे क्षणभरी ॥ १ ॥
मला भरवसा पूर्ण साईचा
ध्यास न मजला अन्य कशाचा
स्मरा स्मरा रे सांई नाम अन्-तराल भवसागरा ॥ २ ॥
जो जो भजतो श्रीसाईसी
साई देव पावतो तयासी
ब्रीद आपुले कधी न सांडी—मात्र पाहिजे विश्वास अंतरी ॥ ३ ॥

—सौ. श्री. शहाणे डोंबिवली.

# साईबाबांची दृष्ट

चाल— तू चाल पुढे तुला रे गड्या ।

शिरडीच्या राया तुला दृष्ट लागली ।
ओवाळीती तुला रे भक्त मंडळी ॥ ध्रु० ॥
निंबातली प्रगटली ही मूर्ती गोजिरी ।
सगुण रूप घेऊनिया येई भूवरी ।
भक्तांचा कैवारी सावळा हरी ॥ १ ॥ ओ०
बापुरीरासाठी देवा टांगेवाला तूं ।
देवाघरी जेवलास गोरक्षक तूं ।
हरविलेली घोडी देवा तूच दाविली ॥ २ ॥ ओ०
त्रिविध ताप हरिसी देवा देऊनी उदी ।
काम क्रोध स्वतप्रसादे मारिती उडी ।
भक्त संकटात कशी घालिसी उडी ॥ ३ ॥ ओ०
भक्तांचा भार साई तूंच वाहसी ।
लेवलीला वर्णाया बुद्धीना मशी ।
बाबांचा पाईक हा लीन पदासी ॥ ४ ॥ ओ०

—श्री. अ. स. सबनीस.

# साई प्रसाद

शिरडीच्या साईनाथा । नाम तुझे गोड ॥
भक्ती भावे शरण आलो । पुरवी माझे कोड ॥
वेधले हे तुझ्या पायी । मन माझे बाबा साई ।
तुझ्या दर्शनाची दृष्टी । धुंडी दिशा दाही ॥ १ ॥
बैसलीये दोन्हीं डोळा । घालुनिया वार्ता ।
वाट पाहे साई देवा । दिवस आणि राती ॥ २ ॥
राहिले विश्वासे तुमच्या । आळवीत नांवा ॥
सौ. माधुरी म्हणे देई भेटी । शिरडीच्या देवा ॥ ३ ॥
शिरडी साईबाबा । नाम तुझे गोड गोड

—सौ. माधुरी कुलकर्णी

# आगमन – प्रसंगी

सुगंधीत झाले विश्व पुलकित ही अवनी
संत-श्रेष्ठ अवलियाच्या आगमन-प्रसंगी ॥ ध्रु० ॥
निंब तरुखालती हे अवतरले रत्न
ध्यानी मनी नसतांना हे हाती आले स्वप्न
कांहीही न करता आम्ही प्रयास प्रयत्न
उद्धरियेले आम्हा, तुम्ही लागवेगी ॥ १ ॥

खिन्न जाहले ते आमुचा पाहोनी प्रताप
अल्पकाळ, होते झाले अदृश्य आपोआप
निस्तराया आमुचे ते अगणित पाप
पुनरपि अवतरले ते वराती-प्रसंगी ॥ २ ॥

साईराया मी आहे पापायांत श्रेष्ठ
परंतु रे तुझी-माझी घडली या भेट
लावशील वाटे तू तर मोक्षास थेट
नाते तुझ्या चरणांशी रे माथे माझे सांगी ॥ ३ ॥

—भ. धों. कुंभकर्ण

# तुझीच सत्ताविधी चाले

अल्ला मालिक । अल्ला मालिक ॥ ध्रु० ॥

कृतज्ञतेचे वच हें ओठी
भक्तिनें स्वर कंपित होती
पाझरते लोचनही गातां अल्ला मालिक ।
अल्ला मालिक । १

मंत्र जाहला मंजुळ गाणे
दुनिया सगळी जणू खेळणे
हसता डुलणे, डुलता गाणे अल्ला मालिक
अल्ला मालिक । २

पृथ्वी आई चन्मद भास्कर
नीलगगन हे शोभतसे घर
समाधान नांदते घरेवर अल्ला मालिक
अल्ला मालिक । ३

तुझीच इच्छा विश्व जन्मके
तुझीच सत्ता विधी चाले
अगाध लीला कुणा आकले ? अल्ला मालिक
अल्ला मालिक । ४

भक्ताच्या घरि हरी राबतो
स्त्रिया मुलांना प्यारा होतो
भाव देखुनी भान विसरतो अल्ला मालिक ।
अल्ला मालिक । ५

—श्रीराम बाळकृष्ण आठवले

# अमृतानुभव अनुभवा नित्यात

घेऊन या प्रसाद आणि उदी शिरडीची
शिरडीची यात्रा भूलोकी मोलाची
मोलाची प्रासादिक भूमी पवित्र
पवित्र वस्तूंचे ओघवती सूत्र
सूत्र सूत्र बध्द तेथील वातावरण
वातावरण आनंदी आनंद बाबांचे चरण
चरण सेवा घडावी अविरत असे भक्त
भक्त तनमन सेवा करून होती मुक्त
मुक्त मुक्ततेचा विडा पैजेचा बाबांजवळ
बाबांजवळ ठेवा जीवनाचा परिमळ
परिमळ खूण अस्तित्वाची हृदयात तेवती
तेवती ज्योत, जीवन मुक्तीची हासो हासी
हासो हासी घ्या अनुभव बाबांच्या सानिध्यात
सानिध्यात राहून, अमृतानुभव अनुभवा नित्यात

चित्रकार–स. कृ. काळे

# माझ्या साईची कृपा

माझ्या साईची कृपा आहे मोठी ॥ ध्रु ॥
नारळाने भरतो माझी ओटी
भारी वस्त्र नेसूनी जरीचे
पुष्प हार ते नाना परीचे
भाळी गंध केशराची ऊटी ॥ १ ॥ ध्रु. ॥ माझ्या साईची
साई नाथाची शिर्डी आहे छोटी
श्रीनामाने जगती झाली मोठी
भक्त येती ते नाना परीचे
साई पावन करी जगताचे
मंदिरी ती गुरुवारी दाटी ॥ ध्रु ॥ २ ॥
मंदिरी बाबा तुझ्या होती दाटी
रजनी विनवी मला दे भेटी
सौभाग्याची भर माझी ओटी
सर्वात्मा बाबा तूंच जगजेठी ॥ ध्रु ॥ ३ ॥

—सौ. रजनी रामराव टेकाळे

## श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशने

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित ( मराठी ) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित ( इंग्रजी ) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित ( गुजराती ) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित ( हिंदी ) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित ( कानडी ) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् ( तेलगू ) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि ( मराठी ) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय ( मराठी ) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना ( मराठी किंवा गुजराती ) | रु. | ०-२० |
| १०. | श्री प्रधानकृत चरित्र ( इंग्रजी ) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत ( मराठी ) | रु. | २-०० |
| १२. | श्री साईलीलामृत ( हिंदी ) | रु. | २-५० |
| १३. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १४. | शीलधी ( मराठी ) | रु. | ०-२० |
| १५. | साईबाबा : अवतार कार्य ( अ. य. धोंड ) | रु. | १-७५ |
| १६. | शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा आल्बम ) | रु. | २-०० |
| १७. | श्री साईलीला मासिक ( मराठी किंवा इंग्रजी ) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास– | रु. | ०-६० |
| १८. | मुलांचे साईबाबा ( द. दि. परचुरे ) ( मराठी ) | रु. | ०-५० |
| १९. | गुजराथी पोथी ( शरणानंद ) | रु. | ५-५० |

☆


**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :–४०० ०१४.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो :

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.